आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर वाचा एका क्लिकवर www.dainiklaturprabhat.in






# दैनिक लातूर प्रभात

E-mail :- laturprabhat@gmail.com

मुख्य संपादक : रघुनाथ बनसोडे मो.नं.८८३०२ ५०६४५,

RNI No.: - MAHMAR/2017/72894 ● वर्ष ८ वे ● अंक ६८ वा ● शुक्रवार दि. ०२ ऑगस्ट २०२४ ● किंमत २ रुपया ● पाने ४ ●


मुख्यमंत्री : माझी लाडकी बहीण सन्मान यात्रा

छत्रपती संभाजीनगर (जिमाका)– 'आनंदाचा शिधा' आणि बसगाडीत अर्ध्या तिकीटात प्रवास या योजनांचा माताभगीनींना थेट लाभ होत आहे. दोन्ही योजना यशस्वी झाल्या आहेत. आता मुख्यमंत्री : माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत रक्षाबंधनाला पात्र लाभार्थी लाडक्या बहिणींच्या खात्यात मुख्यमंत्री भावाकडून रक्कम जमा होईल. ही योजना म्हणजे नारीशक्तिचा सन्मान आहे, असे प्रतिपादन विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी पैठण येथे केले.

'मुख्यमंत्रीः माझी लाडकी बहिण सन्मान यात्रा', या कार्यक्रमाचे आयोजन आज पैठण शहरात करण्यात आले होते. त्या बोलत होत्या. माहेश्वरी धर्मशाळेच्या सभागृहात आयोजित या कार्यक्रमास पैठण तालुका शेतकरी सहकारी खरेदी विक्री संघाच्या संचालक वर्षा भुमरे, पुष्पा गव्हाणे, वैशाली परदेशी, ज्योती वाघमारे व प्रतिभा जगताप आदी महिला उपस्थित होत्या.

## लातूरच्या चन्नबसवेश्र्वर फार्मसी महाविद्यालयाएवढी चांगली संस्था कुठेही पाहायला मिळाली नाही : शिवराज पाटील चाकूरकर

लातूर : आपल्या राजकीय – सामाजिक जीवनात आपण देशाच्या कानाकोपऱ्यात फिरलो, दौरे केले. पण लातूरच्या चन्नबसवेश्र्वर फार्मसी महाविद्यालयाएवढी चांगली संस्था आपल्याला कुठेही पाहायला मिळाली नाही, असे गौरवोद्गार पंजाबचे माजी राज्यपाल तथा माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांनी काढले.

पंचाक्षरी शिवाचार्य ट्रस्टद्वारा संचलित चन्नबसवेश्र्वर फार्मसी महाविद्यालयाच्या वतीने बुधवारी श्री महात्मा बसवेश्र्वर शिक्षण संस्थेच्या नवनिर्वाचित संचालक मंडळाचा सत्कार सोहळा शिवराज पाटील चाकूरकर यांच्या हस्ते आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पंचाक्षरी शिवाचार्य ट्रस्टचे सचिव भीमाशंकर देवणीकर हे होते. यावेळी डॉ. सौ. अर्चनाताई पाटील चाकूरकर, एड. रुद्राणी पाटील चाकूरकर, प्रदीप राठी, ज्येष्ठ विधिज्ञ गुरुनाथप्पा ब्याळे , बसवेश्र्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ सांगवे, एड. सांबप्पा गिरवलकर, सौ. ललिताताई पांढरे, माधवराव पाटील, राजेश्र्वर बुके, बाबुराव तारगुडे, प्रभूअप्पा पटणे , गुरुलिंगप्पा धाराशिवे , गंगा स्वच्छता प्राधिकरणचे सदस्य केशव पाटील, डॉ. जगन्नाथ पाटील, विजयकुमार मठपती गुरुजी, अनुप देवणीकर , अरुण हालकुडे , प्राचार्य डॉ. विजयेंद्र स्वामी, प्राचार्य डॉ. संजय थोंटे आदी मान्यवरांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी मार्गदर्शन करताना ज्येष्ठ नेते शिवराज पाटील चाकूरकर यांनी चन्नबसवेश्र्वर फार्मसी महाविद्यालयाचे कार्य अत्यंत अतुलनीय व नेत्रदीपक असल्याचे सांगून या ठिकाणी विद्यार्थ्यांना ज्ञानाबरोबरच संशोधनाच्या संधी उपलब्ध करून दिल्या जात असल्याबद्दल संधान व्यक्त केले. विज्ञानामुळे प्रगती अधिक गतीने होते. मात्र या ठिकाणी अध्यात्मासोबतच विज्ञानाचाही उत्कृष्ट प्रभाव दिसून येतोय. संशोधन आणि विकासासाठी विषयाची गोडी



असणारी माणसे हवीत, पैशाची उपलब्धी हवी तेव्हाच हे कार्य शक्य होऊ शकते आणि ते या संस्थेने प्रत्यक्षात करून दाखविले आहे. अद्यावत संशोधन आणि विकास कार्याशिवाय आपण अन्य प्रगत राष्ट्रांशी बरोबरी करू शकत नाही. देशाच्या संरक्षण विषयक धोरणासाठीही त्या क्षेत्रातही संशोधन आणि विकास अत्यावश्यक बाबी आहेत. वाढत्या लोकसंख्येच्या तुलनेत अन्नधान्याचे उत्पादन वाढविण्यासाठीही नवनवीन प्रकारची बी – बियाणे, खतांविषयी संशोधन होणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे जगण्यासाठी अन्नधान्यापेक्षाही माणसाचे आयुष्य कमी होऊ नये म्हणून संशोधन होणे गरजेचे असल्याचे चाकूरकर यांनी सांगितले. या संस्थेचे कार्य एवढे चांगले असूनही संस्था प्रचार – प्रसिद्धीपासून दूर का आहे ? असा सवाल करून शिवराज पाटील चाकूरकर यांनी तुम्हाला जरी प्रसिद्धी नको असली तरी समाजातील लोकांना संस्थेच्या कार्याची माहिती मिळावी,याकरिता तरी संस्था पदाधिकाऱ्यांनी प्रचार – प्रसिद्धीचा विषय मनावर घ्यावा,असे आपले मत असल्याचेही चाकूरकर यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्था संचालक विजयकुमार मठपती यांनी केले. प्रास्ताविकात त्यांनी संस्थेच्या आजपर्यंतच्या प्रगतीचा सविस्तर उल्लेख केला. आदिनाथ सांगवे यांनी सत्कारास उत्तर देताना या सन्मानाबद्दल आभार मानून महात्मा बसवेश्र्वर शिक्षण संस्था सर्वांना सोबत घेऊन शैक्षणिक क्षेत्रात अव्वल कार्य करेल असा विश्र्वास व्यक्त केला. सूत्रसंचालन प्रा . प्रताप भोसले व प्रा .जयश्री स्वामी यांनी तर आभार प्रदर्शन प्राचार्य डॉ . संजय थोंटे यांनी केले . कार्यक्रमास सौ. शितल अनुप देवणीकर , विश्र्वनाथ निगुडगे, रामदास भोसले, डॉ. ओमप्रकाश कानडे, नागेश स्वामी, श्रीकांत हिरेमठ, लक्ष्मीकांत मंठाळे , उमाकांत कोरे, शैलेश स्वामी, बाबुअप्पा सोलापूरे यांसह विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा . रवी राजूरकर, डॉ .अनंत देशपांडे , प्रा . बसवराज सुगावे ,प्रा . अविनाश मठपती , प्रा. रामलिंग सुगावे ,डॉ. नसीर शेख , प्रा . रिशा वाले , प्रा दत्ताहरी कवडेवार ,प्रा . वर्षा गायकवाड ,प्रा . मोईन अत्तार , प्रा . प्रशांत बनसोडे , प्रा . रोहित कोंबडे , शिवहार विभुते , गणेश स्वामी , ईश्र्वर डोंगरे ,काशीनाथ स्वामी , विशाल निलंगेकर , अमोल सोनकांबळे , शारदा स्वामी , संगीता पवार ,स्वाती ऐतनबोने ,सिद्धेश्र्वर स्वामी , युवराज खुणे , गुरुलिंग पिचे , अक्षय खंडापुरे विजयालक्ष्मी कुमठेकर , शिवसांब राचट्टे यांनी विशेष परिश्रम घेतले .

## मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे अर्ज भरण्यासाठी संकेतस्थळ कार्यान्वित

लातूर, : मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण




योजनेत ऑनलाइन अर्ज दाखल करण्यासाठी नवीन वेबसाईट (संकेतस्थळ) सुरू करण्यात आले आहे. नारीशक्ती दूत पवर अर्ज भरलेल्या महिलांनी या संकेतस्थळावर अर्ज करण्याची आवश्यकता नाही. तसेच ज्यांनी अद्याप अर्ज सादर केलेले नाहीत, अशा पात्र महिलांनी या संकेतस्थळावर आपले अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी जावेद शेख यांनी केले आहे.

जिल्ह्यात मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेसाठी आतापर्यंत तीन लाखापेक्षा अधिक महिलांचे अर्ज प्राप्त झाले आहेत. उर्वरित महिलांचे अर्ज भरुन घेण्याची कार्यवाही प्राधान्याने सुरु आहे. या योजनेतील महिलांना अर्ज भरण्यासाठी कोणत्याही प्रकारच्या अडचणी येवू नयेत, यासाठी शासनाच्यावतीने https://ladakibahin.maharashtra.gov.in/ हे संकेतस्थळ सुरु करण्यात आले आहे. तरी या योजनेसाठी पात्र महिलांनी अर्ज भरण्यासाठी या संकेतस्थळाचा वापर करावा, असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी श्री. शेख यांनी केले आहे.

## पोस्ट ऑफिसच्या नावे येणाऱ्या फेक कॉल, 'एसएमएस'पासून सावध राहण्याचे आवाहन

लातूर, (जिमाका) : सध्या इंडिया पोस्ट ऑफिसच्या नावे मोबाईलवर फसवणुकीचे प्रकार घडत आहेत. खोटे एसएमएस आणि कॉल करून पत्ता अपडेट करणे किंवा बँक खाते अपडेट करण्यासाठी चौकशी केली जात आहे. यासाठी एखादी वेबलिंक पाठवली जात आहे किंवा ओटीपी विचारला जात आहे. अशा प्रकारापासून नागरिकांनी सावध राहण्याचे आवाहन धाराशिव विभागाचे डाक अधीक्षक संजय एन. अंबेकर यांनी केले आहे.

अशा कुठल्याही प्रकारचे एसएमएस किंवा कॉल किंवा वेबलिंक भारतीय डाक विभागामार्फत पाठविले जात नाहीत. तसेच कुठलाही ओटीपी भारतीय डाक विभागामार्फत मागितला जात नाही, याची सर्व जनतेने नोंद घ्यावी आणि सतर्क रहावे, असे आवाहन श्री. अंबेकर यांनी केले आहे.

## लोकशाहीर अण्णा भाऊंचे साहित्य लढणाऱ्या माणसांसाठी दीपस्तंभ - मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

मुंबई, : लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य जगभर प्रसिद्ध असून त्यांचा वाटेगाव ते मॉस्को प्रवास आहे. तो उल्लेखनीय असून त्यांच्या साहित्यातून समाजात क्रांतिकारी परिवर्तन घडले आहे. त्यांचे साहित्य वीस पेक्षा अधिक भाषेत अनुवादित झाले असून त्यांचे साहित्य जगण्यासाठी लढणाऱ्या माणसांसाठी दीपस्तंभासारखे आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

अण्णा भाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्था (आर्टी) कार्यालयाचे उद्घाटन मुख्यमंत्री श्री.शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच वेबसाईट, पोर्टल व सहज शिक्षा ॲपचे उद्घाटन ही यावेळी करण्यात आले. लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या १०४ व्या जयंतीनिमित्त मुंबईतील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्यावतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी मुख्यमंत्री श्री. शिंदे बोलत होते.

मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, अण्णा भाऊ साठे यांच्या नावाने शिष्यवृत्ती किंवा कर्ज मिळणे ही आर्थिक जबाबदारी नसून ती सामजिक जबाबदारीची जाणीव आहे. हे भान युवकांनी ठेवले पाहिजे.




## आपत्कालीन परिस्थितीत तातडीने आरोग्य सेवा उपलब्ध करावी - सार्वजनिक आरोग्य मंत्री डॉ.तानाजी सावंत

मुंबई, : यावर्षी पावसाचे वितरण असमान दिसून येत आहे. काही भागात कमी कालावधीत मोठा पाऊस होत आहे. कोकण, पश्र्चिम महाराष्ट्र व पूर्व विदर्भातील भागात पूरपरिस्थिती निर्माण झाली. पूर परिस्थितीत साथरोग नियंत्रणासाठी आरोग्य विभागाने सतर्क असावे. त्यासाठी शहर, गावांमध्ये स्वच्छतेसह डास निर्मूलन मोहीम राबवावी. पुरासारख्या आपत्कालीन परिस्थितीत आरोग्य विभागाने तातडीने आरोग्य सेवा उपलब्ध करून द्यावी, असे निर्देश सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रा. डॉ. तानाजी सावंत यांनी दिले.

दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे पुणे येथून मंत्री डॉ. सावंत यांनी राज्यातील साथरोग नियंत्रणाबाबत आढावा घेतला. यावेळी दुरदृश्य संवाद प्रणालीद्वारे आरोग्य विभागाचे अप्पर मुख्य सचिव मिलींद म्हैसकर, संचालक डॉ. नितीन अंबाडेकर,सहसंचालक डॉ.राधाकिसन पवार व सर्व जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी उपस्थित होते.

पावसाळ्याच्या काळात आरोग्य यंत्रणेने अलर्ट मोडवर काम करण्याच्या सूचना करीत आरोग्य मंत्री डॉ. सावंत म्हणाले की, स्वच्छता राखणे व डास निर्मूलनासाठी शहरांमध्ये नगर विकास विभागाचे मनुष्यबळ या कार्यवाहीसाठी उपयोगात आणावे. तसेच ग्रामपंचायतींमध्ये ग्रामविकास व महसूल विभागाच्या मदतीने ही मोहिम राबवावी. ग्रामपंचायतस्तरावर डास निर्मुलन, अशुद्ध पाणी, साथरोगाबाबत घ्यावयाची काळजी याबाबत ठळक अक्षरात जनजागृतीपर लावण्यात यावेत. यामुळे गावपातळीवर नागरिक जागरूक होवून प्रतिबंधात्मक उपाययोजना करतील. दवाखान्यांमध्ये मनुष्यबळ कार्यरत असेल याविषयी सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांनी काळजी घ्यावी. डॉक्टर नसल्यामुळे उपचार मिळाले नाहीत, अशी परिस्थिती कुठेही उद्भवू नये.

जिल्ह्यातील डॉक्टर, संबंधित यंत्रणेशी जिल्हा शल्य चिकित्सक व जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी दररोज किमान एक तास दूरदृश संवाद प्रणालीद्वारे संवाद साधून साथरोगाबाबतची परिस्थिती जाणून घ्यावी. आरोग्यसेवेसाठी बाळासाहेब ठाकरे आपला दवाखानाची मदत घेण्यात यावी, असेही मंत्री डॉ. सावंत यांनी सांगितले.

## कापड्याच्या दुकानात चोरी करणाऱ्या अट्टल गुन्हेगाराला, १ लाख २८ हजार रुपयाच्या मुद्देमालासह अटक. स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई.

लातूर : याबाबत थोडक्यात माहिती की, लातूर जिल्ह्यातील रेणापूर पोलीस ठाणे हद्दी मध्ये रात्रीच्यावेळी एका कपड्याच्या दुकानाचा पत्रा काढून साड्या व कपडे चोरल्याची घटना घडली होती. त्यावरून अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता.



पोलीस अधीक्षक सोमय मुंडे ,अपर पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे, यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांचे नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अधिकारी व अमलदारांचे पथक तयार करून त्यांना सखोल मार्गदर्शन व सूचना देण्यात आल्या होत्या.

सदर पथकाकडून गुन्ह्याचा तपास सुरू असताना वरिष्ठांचे मार्गदर्शनात सदरच्या पथकांनी गुप्त बातमीदाराकडून नमूद गुन्ह्यातील आरोपींची माहिती मिळाली.

सदर पथकाने नमूद गुन्ह्यातील आरोपीला दिनांक ३०/०७/२०२४ रोजी कळंब तालुक्यातील पाथर्डी येथून ताब्यात घेऊन त्याच्याकडे विचारपूस केली असता त्यांनी त्यांचे नाव

१) दादा बब्रुवान पवार, वय ४५ वर्ष राहणार पाथर्डी तालुका कळंब जिल्हा धाराशिव (उस्मानाबाद)

असे असल्याचे सांगितले.

त्याच्या घराची झडती घेतली असता घरा मध्ये नवीन साड्या व कपडे मिळून आले. त्याबाबत त्याच्याकडे विचारले तेव्हा त्याने त्याच्या पत्नीसह लातूर जिल्ह्यातील रेनापुर येथील एका कपड्याच्या दुकानात चोरी केल्याचे व त्यामध्ये चोरलेले साड्या व कपड्याचा मुद्देमाल असल्याचे कबूल केले.

त्यावरून नमूद आरोपीस त्याने चोरलेल्या मुद्देमाल व गुन्ह्यात वापरलेल्या मोटार सायकलसह पुढील कारवाई करिता पोलीस ठाणे रेणापूर यांचे ताब्यात देण्यात आले आहे. असून त्याच्या सोबत असलेल्या त्याच्या पत्नीचा शोध सुरू आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे, मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांच्या नेतृत्वातील पथकामधील पोलीस उप–निरीक्षक संजय भोसले, पोलीस अमलदार रामहरी भोसले, मोहन सुरवसे, योगेश गायकवाड, प्रकाश भोसले, सुरेश कलमे, प्रदीप चोपणे ,सहाय्यक पोलीस निरीक्षक अमितकुमार पुणेकर, पोलीस अमलदार गोरोबा इंगोले, अंकुश बिराजदार यांनी केली आहे.

## अवयवदान दिनानिमित्त जनजागृती प्रभातफेरीचे आयोजन

मुंबई, : वैद्यकीय शिक्षण व संशोधन विभाग व आयुष संचालनालय मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने भारतीय अवयवदान दिन ०३ ऑगस्ट २०२४ रोजी साजरा करण्यात येणार आहे. या दिनानिमित्त अवयवदान जनजागृती प्रभातफेरीचे आयोजन करण्यात आले आहे. ही प्रभातफेरी सकाळी ८ वाजता नरिमन पॉईंट (NCP– समोर) ते यशवंतराव चव्हाण सेंटर पर्यंत होणार आहे .

आरोग्य व कुटुंब कल्याण विभाग भारत सरकार व वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग महाराष्ट्र शासन यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार राज्यातील सर्व शासकीय वैद्यकीय, दंत व आयुष महाविद्यालयामार्फत अवयवदान निमित्त विविध जनजागृती कार्यक्रम तसेच वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या विविध स्पर्धा घेण्यात आल्या रांगोळी स्पर्धा, पोस्टर स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, पथनाट्य, प्रभातफेरी इत्यादींचा यामध्ये समावेश होता.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून विधानसभा अध्यक्ष ॲड राहुल नार्वेकर, शालेय शिक्षण, मराठी भाषा मंत्री तथा पालकमंत्री, मुंबई शहर दिपक केसरकर, मुंबई शहर जिल्हाधिकारी संजय यादव यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाचे प्रधान सचिव दिनेश वाघमारे व वैद्यकीय शिक्षण व आयुषचे आयुक्त राजीव निवतकर यांनी कार्यक्रमात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

## सायबर गुन्ह्यांच्या तक्रारी नोंदविण्यासाठी हेल्पलाईन, वेब पोर्टलचा वापर करण्याचे आवाहन

मुंबई, : माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञानाचा वापर अधिक वाढल्याने सायबर गुन्ह्यांच्या घटनांमध्येही वाढ झाली आहे. सायबर गुन्हे रोखण्यासाठी अशा गुन्ह्यांबाबत जागरुकता वाढविणे आवश्यक आहे. सायबर गुन्ह्यांच्या तक्रारी नोंदविण्यासाठी नॅशनल सायबर क्राईम हेल्पलाइन १९३० या नंबरचा वापर करावा, नॅशनल सायबर क्राईम रिपोर्टिंग पोर्टलवर नोंदणी करावी. तसेच सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर 'सायबर दोस्त' (Cyberdost) या अधिकृत सोशल मीडिया हँडलला फॉलो करण्याचे आवाहन गृह विभागाने केले आहे.

सध्या देशामध्ये मोबाईल फोन तसेच माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञानाचा वापर वाढल्याने सायबर गुन्ह्यांच्या घटनांमध्येही झपाट्याने वाढ झाली आहे. त्या अनुषंगाने सायबर गुन्ह्यांबाबत जागरुकता ही बचावाची प्रथम पायरी असल्याने, केंद्र शासनाच्या गृह विभागांतर्गत असलेल्या भारतीय सायबर क्राईम समन्वय केंद्राने (इंडियन सायबर क्राइम कोऑर्डिनेशन सेंटर – I4C) सायबर गुन्हेगारीबाबत नागरिकांमध्ये जागरुकता वाढविण्यासाठी विशेष उपक्रम हाती घेतला आहे. कोणत्याही आर्थिक सायबर गुन्ह्याच्या तक्रारीची नोंद करण्यासाठी तत्काळ नॅशनल सायबर क्राईम हेल्पलाइन नंबर १९३० वर कॉल करावा अथवा www.cybercrime.gov.in या नॅशनल सायबर क्राईम रिपोर्टिंग पोर्टलवर नोंदणी करावी. सायबर क्राइमबाबत ताज्या घडामोडींच्या माहितीसाठी केंद्रीय गृहमंत्रालयाच्या सायबर दोस्त (Cyberdost) या अधिकृत सोशल मीडिया हँडलला फॉलो करण्याचे आवाहन गृह विभागामार्फत करण्यात आले आहे.

'सायबर दोस्त'ला पुढील लिंकवर क्लिक करुन फॉलो करु शकता – https://x.com/Cyberdost https://www.facebook.com/CyberDostI4C https://www.instagram.com/cyberdosti4c

## पाळज येथे मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण उपक्रमाने महसूल पंधरवाडा कार्यक्रमाची सुरुवात

भोकर / सिद्धार्थ जाधव / महाराष्ट्र राज्यात १ ऑगस्ट रोजी



महसूल दिन साजरा करण्यात येतो याच अनुषंगाने यावर्षी महसूल दिनापासून म्हणजेच १ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट या दरम्यान राज्यभरात महसूल पंधरवाडा हा उपक्रम साजरा करण्यात येत आहे. या अनुषंगाने प्रत्येक दिवशी महसूल विभागामार्फत विशेष मोहीम, कार्यक्रम, उपक्रम, शिबिरे, महसूल अदालत यांचे आयोजन करण्यात येणार आहे.

या अनुषंगाने महसूल दिन व महसूल पंधरवडा मोहीमेचा शुभारंभ मुख्यमंत्री– माझी लाडकी बहीण योजना या शिबिराच्या माध्यमातून करण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्यात १ ऑगस्ट रोजी महसूल दिन साजरा करण्यात येतो याच अनुषंगाने भोकर तालुक्यातील पाळज येथे मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात आले होते. यामध्ये उपस्थित महिलांना योजनेच्या पात्रतेचे निकष समजावून सांगण्यात आले. तसेच २१ ते ६५ वयोगटातील महिलांचे अर्ज भरून घेण्यात आले. यावेळी भोकर चे उपविभागीय अधिकारी प्रवीण मेंशेट्टी,तहसीलदार सुरेश घोळवे, मंडळ अधिकारी शेख मुसा शेख सरवर, यांच्यासह तलाठी, ग्रामसेवक,सरपंच, पोलीस पाटील, ग्रामपंचायत सदस्य व पाळज येथील महिला भगिनी यांची उपस्थिती होती.

भोकर तालुक्यात आतापर्यंत मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत २१ हजार ऑनलाईन अर्ज प्राप्त झालेले आहेत. त्यावर तालुकास्तरीय समितीतील सदस्याकडून छाननी करण्याचे काम सुरू आहे.


आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर वाचा एका क्लिकवर www.dainiklaturprabhat.in

# झरोका

एक – निट परिक्षा, यंत्रणा संख्यावरील नियूक्ती संदर्भात संघाचा संबध आहे की नाही असा प्रश्न समाजवादी पक्षाचे खासदार रामजीलाल सुमन यानी विचारताच राज्यसभा सभापती जगदीप धनखड यानी संघावरील आक्षेप असंविधानिक असल्याचा आक्षेप घेतला हे काय गौडबंगाल आहे हेच कळत नाही. डोकं बधीर झालंय.

दुसरा – अरे, राज्यसभा सभापती हे ही राष्ट्रीय स्वंयसेवक संघातूनच पूढे आलेले आहेत. त्याना संघावरील भाजपावरील टीका कशी काय सहन होईल म्हणून ते ताडकन असंविधानिक बोलले असतील त्यात तू कशला तोंड खूपसतो आहेस.

एक – अहो, शासकीय कर्मचाऱ्यानी संघाच्या कार्यात सहभागी होऊ नये अशी बंदी होती ती केंद्र सरकारने उठविली असताना शासकीय संस्था मध्ये अशासकीय सदस्य किंवा संचालक म्हणून संघाशी संबंध आहे की नाही असे विचारल्याने काय बिघडले म्हणून बोलतोय.

दुसरा – अरे, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे जे बोलतील, निर्णय घेतील ते मान्य करुन नंदी बैलासारखे माना डोलवाव्या लागतात. शंका उपस्थित करता येत नाही आणी तसे कोणी बोलले, विचारले तर संसदीय भाषा, धर्म, जात निघत असते समजले.

एक – अहो, लोकशाहीत चर्चेला महत्व असते. निट प्रकरण, युपीएससी प्रकरणाने सारा देश हादरला आहे. मग संघा बद्दल बोलले, विचारले, चौकशी केली तर त्यात काय चूक आहे हेच कळत नाही.

दुसरा – अरे, लोकशाही, संविधाना पेक्षा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी याना भाजपा, राष्ट्रीय स्वंयसेवक संघ महत्वाचा आहे. लोकसभा, राज्यसभा अध्यक्ष वगैरे बाहूले आहेत. त्यांचे कशाला मनावर घेतोस.

एक – अहो, असे कसे चालेल. काळ त्या भाजपाच्या अनुराग ठाकूर यानी चक्क राहूल गांधी याना जातच नाही म्हटले, खा. सुमन यानी संघाबद्दल विचारणा केली तर असंविधानीक असल्याचा आक्षेप सभापती धनखड करतात हे काय चाललय तेच कळत नाही.

दुसरा – अरे, जो पर्यंत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे कार्यरत आहेत तो पर्यंत हे असेच चालत राहाणार आहे जर कदाचित भारतीयाना लोकशाही संविधानाची गरज असेल तर विनाविलंब प्रधानमंत्री नरेंद्र मोदी याना विश्वगुरु बनवून तशी शक्ती देवून हिमालयाच्या पायथ्याशी आश्रय, रामालय निर्माणण्यासाठी जपमाला करावी लागेल एवढेच.

# संसदेला जातीचे भिरुड कशाला ?

## संपादकीय...

संसद हे समानतेचे, विकासात्मक न्यायाच, लोकशाहीचे मंदीर आहे. सामाजीक न्याय, स्वातंत्र्य समानता, बंधूभाव, धर्मनिरपेक्ष न्यायाचे मंदीर, विहार असताना अशा या पवित्र संसदेला जातीय वादाचे भिरुड लावणे, लागणे ही बाब लोकशाही भारताला कलंकित करणारी बाब ठरावी अशीच प्रतिक्रिया सर्व सामान्य जनतेत होताना दिसते आहे. कारण भाजपानेते माजी केंद्रीयमंत्री अनुराग ठाकूर यानीच विरोधी पक्षनेते राहूल गांधी यानाच ज्याना जात नाही, त्यानीच जातनिहाय जनगणनेची मागणी करावी अशी खिल्ली उडवून संसदेलाच डाग लावल्याने हे भिरुड संसदेला लावणाऱ्या कृती, वृतीचा निषेध करावा तेवढा कमीच असावा अशी लोकभावना व्यक्त होताना दिसते आहे.

लोकशाही राज्यात प्रत्येकाना मत व्यक्त करण्याचा अधिकार आहे. पण तो गैरनसावा याची खबरदारी घेतली पाहीजे. राष्ट्रीय स्वंयसेवक संघ, भाजपा नेते विविध जाती, धर्माच्या भारताला हिंदू राष्ट्र समजतात पण भारतात, हिंदू, जैन, मुस्लिम, शिक्ष, पारशी, बौध्द, दलित, ख्रिश्चन, कानडी वगैरे असूच शकत नाहीत त्यात राजकारणास, निवडणूक प्रसंगी राखीव जागाचा, खूल्या प्रवर्गाचा विषय नेहमीच वापरात असल्याने वाद–विवाद नको, न्यायीक आरक्षण मिळावे त्यासाठी जातनिहाय जनगणना महत्ववाची असल्याने तशी मागणी करणे रास्त,न्यायीक असताना त्या संदर्भात राहूल गांधी निवेदन करीत असताना राहूल गांधी याना ज्याना जात नाही म्हणजेच चूक द्वेषमुलक ठरते कारण प्रत्येकाला कोणती ना कोणती जात असतेच. तृतीय पंथीयानाही ती व्यक्ती एका समूहाची अर्थात वेगळ्या जातीची समजून त्याना शासकीय सवलती देण्यात येतात. राहूल गांधी हे भारतीय आहेत. त्यांच्या आई या परदेशी असल्या तरी राहूल गांधी यांच्या आई, वडीलाना जात आहेत. मग पुरुषप्रधान संस्कृती नुसार गांधी यानाही जात असताना भाजपाचा कोणी बिनडोक व्यक्ती, खासदार त्याना जात नाही असे म्हणूच शकत नाही ते ही संसदेत असा शब्द उच्चारणे संसदीय राजकारण, सत्ताकारणाला अशोभणीय वाटते पण सत्तेच्या बळावर संसदेत जात, धर्मावर आधारीत शब्द वापरुन संसदेलाच बदनाम करण्याचे षढयंत्र भाजपा करीत असून प्रधान मंत्री नरेंद्र मोदी आणी लोकसभा अध्यक्ष बिर्लाहे खतपाणी घालीत असावेत ही बाब निंदणीय ठरते अशीच प्रतिक्रिया राजकीय वर्तूळात होताना दिसते आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे मंत्री, खासदाराच्या आडून हिंदूत्ववाद, मनुसंस्कृती लादण्याचा प्रयत्न करुन जातीयवादी, धर्मांध विचाराच्या राष्ट्रीय स्वंयसेवक संघाला बळ देवू पाहात आहेत. तर अनुराग ठाकूर यांचेसारखे भाजपानेते चक्क एखाद्या विरोधी पक्षाच्या खासदारालाच जात, धर्म नाही असा सवाल संसदेत उपस्थित करुन संसदेची प्रतिष्ठा कलंकीत करण्याचा प्रयत्न करीत असताना अशा बेजबाबदार सदस्याना जाब विचारण्याऐवजी अशा संसद सदस्याला पाठीशी घालून संसद व लोकशाहीचा अधिक्षेपच करीत असल्याची उलटसूलट प्रतिक्रिया समाजमाध्यमातून उमटताना दिसते आहे, हि बाब चिंतणीय वाटते.

जात, धर्माला बळकटी देवून विरोधी राजकीय पक्षाना कमकूवत करणे, विरोधी पक्षाच्या सदस्याना चर्चेसाठी आटकाव करणे या बाबी सत्ताधारी समूहाकडून होत असून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे अशा गैरकृती, वृतीना जाणीवपूर्वक खतपाणी घालीत असल्याची कुजबूज राजकीय वर्तूळात होत असून अशा निंदणीय कृती, वृतीच्या विरोधात उभे राहाणे हीच काळाची गरज असल्याचा बोलबाला होताना दिसतो आहे.

लोकशाही भारताची संसद ही जगाला आदर्श ठरावी अशी लोकभावना असताना तित बसून कार्यरत राहाणारे संसद सदस्यच संसदेच्या पावित्र्याला, इतिहासालाच काळीमा फासून एकाद्या सदस्याच्या जातीलाच त्यांना जात नाहीच असा बिनबूडाचा असंसदीय दावा करुन कलंकित करणे हेच लोकशाही प्रणालीस घातक असून अशा अनेक छूप्या अनुराग ठाकूर यानाच लोकप्रतिनिधी नाकारावे अशीच लागणी होताना दिसते आहे. ती न्यायीक ठरावी अशी ही प्रतिक्रिया उमटताना दिसते आहे. कारण सत्तेच्या माजात एखादा भाजपानेता संसदेलाच, संसदसदस्यालाच जातीचा, जातीयवादाचा, जात नसल्याचा आणी जातीवर राजकारण करु पाहत जातीचे भिरुडच लावणार असेल तर जनता ती कृती, वृती कधी ही सहन करु शकणार नाही. एवढेच पूरेशे वाटते.

# जखमा जुन्याच ;परंतु वायनाड सारखे नवीन-नवीन घाव चिंताजनक.

पुण्यातील ३० जुलै २०१४ माळीण दुर्घटनेची व रायगड जिल्ह्यातील इर्शाळवाडी सारख्या अनेक दुःखद व अंगावर शहारे येणाऱ्या घटना पुर्वीही झाल्यात.त्याचीच पुनरावृत्ती आज वायनाडमध्ये निर्माण झाली आहे. तरीही आपण अजूनपर्यंत निसर्गावर होणारे आघात आपण रोखू शकलो किंवा जातीने लक्ष देवू शकलो नाही व पाहिजे त्या प्रमाणात वृक्षलागवड करू शकलो नाही हे मानवजातीचे दुर्भाग्य म्हणावे लागेल.याच घटनांची पुनरावृत्ती दिनांक ३० जुलै २०२४ ला पहाटे धुव्वाधार कोसळणाऱ्या पावसाने मोठा आघात करून गाढ झोपेत असलेल्या गावकऱ्यांवर पुन्हा निसर्ग कोपुन भूस्खलनामुळे केरळमधील वायनाडवर मोठा आघात करत वायनाडमधील चार गावे ढिगाऱ्याखाली दबली व यात १२३ जणांचा मृत्यू झाला तर १२८ जण गंभीर जखमी झालेत तर आताही अनेक ढीगाऱ्याखाली असल्याचे सांगितले जाते ही अत्यंत भयावह व अंगावर शहारे येणारी घटना आहे.वायनाड मधील २२०० जनसंख्या असणारे ४ गाव ४ तासात भूस्खलनाने जमीनदोस्त झाली.केरळमध्ये २०१८ मध्ये कमी वेळात जास्त पाऊस झाल्याने भूस्खलनामुळे ४०० लोकांचा मृत्यू झाला होता. तेव्हापासुन केरळमध्ये कमी वेळात जास्त पाऊसाचे प्रमाण वाढल्याने केरळमध्ये आकस्मिक आपदाने चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.जास्त पावसामुळे भूस्खलनाचे क्षेत्र ३.४६ टक्क्यांनी वाढले आहे.देशातील २०१५ ते २०२२ पर्यंत ३७८२ भूस्खलन झाले त्यापैकी ५९ टक्के भूस्खलन एकट्या केरळमधील आहे हा अत्यंत चिंतेचा व गंभीर विषय आहे. इर्शाळवाडीची घटना अत्यंत दुःखद आणि अंगावर शहारे येणारी होती.दिनांक २० जुलै २०२३ ला कोसळत्या धुव्वाधार पावसात आणि गार वाऱ्यात ४९ कुटुंब गाढ झोपेत होते तेवढ्यात मातीचा मोठा ढिगारा डोंगरावरून घरंगळत खाली आला आणि त्याने अर्धावरून अधिक गाव गिळंकृत केले यात आतापर्यंत २९ जणांचा मृत्यू झाला होता.यापुर्वीही अशाच भयावह घटना आपण उघड्या डोळ्यांनी पहिल्यात यावर देशातील राज्य सरकारे व केंद्र सरकार तात्पुरती उपाययोजना करून शांत बसते.परंतु पुन्हा–पुन्हा त्याच त्या दुःख घटना उद्भवतात व नवीन–नवीन जखमा करून जातात यावर केंद्र व राज्य सरकारने गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे आणि त्याचे जिवंत उदाहरण म्हणजे वायनाडची भूस्खलनाची ताजी घटना.देशात अजुनही असे अनेक क्षेत्र आहे की त्याठिकाणी मुलभूत सुविधांचा अभाव आहे. पावसाचे तांडव,काळीज चिरणाऱ्या दुर्घटना आणि मृतदेहाचे ढिगारे हे अलीकडे पहाले आहे. महाराष्ट्रात यापूर्वी दासगाव, सावित्री पूल, तळीये, तारिक गार्डन,ईर्शाळवाडीची भयावह घटना या जुन्या जखमा अद्याप भरून निघालेल्या नसतानाच आता निसर्गाने वायनाडवर प्रहार केला व निष्पाप लोकांचा बळी गेला.२६ जुलै २००५ ला दासगाव,जुई, कोंडीवते व रोहन या गावात दरडी कोसळून १९४ जणांचा मृत्यू झाला होता,२ऑगस्ट २०१६ला सावित्री नदीवरील पूल कोसळून ४० जणांचा बळी गेला,२५ ऑगस्ट २०२० ला महाडमधील तारिक गार्डन ही पाच मजली इमारत कोसळून १६ जण मृत्युमुखी पावले,२२ जुलै २०२१ ला पोलादपूर तालुक्यातील सुतारवाडी येथे भूस्खलन होऊन दरडीखाली ६ जणांचा मृत्यू झाला,याच दिवशी २२ जुलै २०२१ ला महाड तालुक्यातील तळीये हे गाव डोंगराखाली गडप झाले आणि ८७ लोकांचा जीव गेला आणि आता वायनाडची घटना ह्या सर्व घटना होऊन गेल्या तरीही देशातील राज्यांना जाग का येत नाही? मानवाने जंगल संपदा नष्ट केल्याने पुन्हापुन्हा अशा नैसर्गिक भयावह घटना घडत आहेत.

त्यामुळेच पुन्हा–पुन्हा जुन्या जखमा ताज्या होतांना दिसतात व वायनाड सारखा जब्बर घाव सहन करावा लागतो हे केरळचे व देशाचे दुर्दैवच म्हणावे लागेल. देशातील किंवा राज्यातील दरड कोसळण्याच्या घटना मुख्यत्वेकरून वृक्षतोडीमुळे होत आहे ही बाब सरकार, प्रशासन, लोकप्रतिनिधी, राजकीय पुढारी, पक्ष–विपक्ष यांना माहित असुन सुद्धा देशातील अनेक राज्यात मोठ्या प्रमाणात वृक्षकटाई सपाट्याने सुरू असल्याचे आपल्याला दिसून येते.आज राज्यासह देशात मोठमोठे महामार्ग (हायवे), औद्योगिकीकरण,रस्ते रूंदीकरण,वाढत्या लोकसंख्येमुळे वस्त्यांचे वाढते प्रमाण यामुळे दऱ्याखोऱ्याना मोठे नुकसान होत आहे व धाराशाही होतांना आपण पहातो. ग्लेशिअर वितळले अशा अनेक नवीन–नवीन आपदा निर्माण होत आहे अती पावसामुळे संपूर्ण पाणी समुद्रात जाऊन दिवसेंदिवस समुद्राची पातळी वाढत आहे ही मानवजातीसाठी व पृथ्वीतलावरील जीवजंतूसाठी धोक्याची घंटा आहे.हे सर्व प्रकार लाखो–करोडोच्या संख्येने वृक्षतोड केल्याने होत आहे. त्याचाच परिणाम आज आपल्याला नैसर्गिक आपदाच्या रूपात वायनाडमध्ये पहायला मिळत आहे.निसर्गावर होत असलेल्या अन्यायामुळे दरड कोसळणे, भूस्खलन, अतीपाऊस, अती थंडी,अती उष्णतेच्या रूपात भोगावा लागते आहे. राज्यातच नाही तर देशात अनेक नैसर्गिक आपदा येत असतात. परंतु यावर वेळीच उपाययोजना केली नाही तर पुन्हा–पुन्हा त्याची पुनरावृत्ती वायनाडच्या रूपात होतांना आपल्याला दिसते आणि यापुढेही दिसेल सुध्दा. आपण देशाचा विचार केला तर एकट्या २०२२ मध्ये ३८७ नैसर्गिक आपत्ती आल्यात त्यात ३०७०४ लोकांचा मृत्यू झाला.वायनाड सारख्या घटनेची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी सरकारने वेळोवेळी पाऊले उचलली पाहिजेत.१९०० ते २०२२ पर्यंतची भारतातील नैसर्गिक आपत्तीची आकडेवारी पहाली तर चकीत करणारी आहे या कालावधीत ७६४ नैसर्गिक आपत्ती आल्यात यात ९१ लाख ३५ हजार ५५६ लोकांचा मृत्यू झाला याचा फटका सर्वाना सहन करावा लागला. ह्या सर्व घटना बदलत्या हवामानामुळे होत आहे. कारण भारतातीलच नाही तर जगातील ५० टक्के जंगलसंपदा वृक्ष तोडीमुळे नेस्तनाबूत झाली आहे. यामुळे सध्याच्या परिस्थितीत भारत,चीन, दक्षिण कोरिया, आणि बांगलादेश, पाकिस्तान महापुराच्या विरखळ्यात अडकलेला आहे.तर दुसरीकडे थंड हवामानाच्या युरोपमध्ये उष्णतेचा कहर सुरू आहे. त्याचप्रमाणे अमेरिकेच्या काही राज्यांत उष्णतेची लाट आहे तर काही राज्यांना पुराचा तडाखा बसला आहे. ब्रिटनमध्ये नेहमी पेक्षा जास्त पाऊस झाल्याने ब्रिटन जलमग्न झाले आहे.दूबई कधीच एवढा पाऊस येत तेवढा पाऊस तीथे झाला होता. तापमानातील वाढ आणि हवामानातील बदलांचे फटके जगभरातील बहुतेक देशांना बसायला सुरुवात झाली आहे.कोरड्या प्रदेशात मुसळधार पाऊस,तर पावसाच्या प्रदेशांत दुष्काळ अशी विपरीत परिस्थिती बदलत्या हवामानामुळे जगभर निर्माण होऊ लागली आहे.यामुळे एकीकडे उष्णतेची लाट तर दुसरीकडे महापुर अशें विचित्र संकट जगावर ओढावल्याचे दिसून येते.हे सर्व संकट मानवाने स्वतःहून ओढावले आहे. त्यामुळे वायनाड सारख्या घटनांची पुन्हा–पुन्हा पुनरावृत्ती होऊ नये याकरिता सरकारने गांभीर्याने लक्ष केंद्रित करून वेळोवेळी पाऊले उचलली पाहिजेत. तेव्हाच आपल्याला नैसर्गिक आपदाच्या घटनांवर थोडा का होईना अंकुश लावण्यास मदत होईल.नैसर्गिक आपदा रोखण्यासाठी वृक्षतोड ताबडतोब थांबविली पाहिजे व मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करून दऱ्याखोऱ्याना पुनर्जीवित केले पाहिजे हिच देशातील राज्य सरकारांकडून कडून अपेक्षा!, सध्याच्या परिस्थितीत महाराष्ट्रासह देशभरात पावसाने धुमाकूळ घातला आहे त्यामुळे महाराष्ट्रातील अनेक जिल्हे रेड अलर्टवर आहे. त्याचप्रमाणे देशातील अनेक राज्ये सुध्दा रेड अलर्टवर आहे.कुठे ढगफुटी तर कुठे सतत पावसामुळे जनजीवन विस्कळित झाले आहे. त्यामुळे सर्वांनीच सावधगिरी बाळगावी आणि आपल्या जीवाची काळजी घ्यावी व प्रशासनाची मदत घ्यावी.कारण देशातील अनेक राज्यांचा पावसाचा धोका अजून पर्यंत टळलेला नाही. सावधान!

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**(माजी विद्यापीठ प्रतिनिधी नागपूर)**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# खड्डेच खड्डे चूहीकडे.... गेला रस्ता कुणीकडे....?

पाऊस आणि रस्त्यांवरील खड्डे हे जणू समीकरणच बनले आहे. थोडासा जरी पाऊस झाला तरी रस्त्यांवर मोठ मोठे खड्डे पडतात. दरवर्षी पावसाळ्यात मुंबई, ठाणे, नवी मुंबई, पुण्यासह राज्यातील सर्वच शहरातील रस्त्यांवर खड्ड्यांचे साम्राज्य निर्माण होते. यावर्षीही राज्यातील सर्वच शहरातील रस्ते खड्डेमय झाले आहेत. काही रस्त्यात तर इतके खड्डे पडले आहेत की रस्त्यात खड्डे आहेत की खड्ड्यात रस्ता हेच समजत नाही. केवळ शहरी भागातच नाही तर राज्य आणि राष्ट्रीय महामार्गावरील रस्त्यांवर देखील खड्डे पडले आहेत. जर शहरात अशी अवस्था असेल तर ग्रामीण भागात काय अवस्था असेल याची कल्पनाच न केलेली बरी. खड्डेच खड्डे चूहीकडे..... गेला रस्ता कुणीकडे....? अशीच अवस्था काही गावातील रस्त्यांची झाली आहे.

रस्त्यांवर खड्ड्यांचे साम्राज्य असल्याने वाहन चालकांना तर मोठी कसरत करावी लागते. अगदी जीव मुठीत घेऊन वाहन चालक खड्डेयुक्त रस्त्यांवरून गाडी चालवत असतात. रस्यांवरील खड्ड्यांमुळे अनेकदा वाहनांचा अपघात होतो त्यात काही वेळा जीवितहानी देखील होते. देशात सर्वाधिक मृत्यू हे रस्ते अपघातात होतात मात्र याचे कोणाला काही सोयरसुतक नसते वास्तविक रस्ते खड्डेमुक्त करण्यासाठी शासन दरवर्षी कोट्यवधी रुपये खर्च करते. रस्ता बांधणीसाठी आणि दुरुस्तीसाठीही कोट्यावधींचा खर्च केला जातो मग प्रश्र्न पडतो की इतका पैसा खर्च करूनही रस्त्यावरील खड्डे कायमचे नाहीसे का होत नाही? खड्डेमुक्त महाराष्ट्र करण्याचे आश्र्वासन राजकीय नेते आणि राजकीय पक्ष देत असतात मग असे असूनही परिस्थिती जैसे थे राहते याला भ्रष्ट अधिकारी, ठेकेदार आणि स्थानिक लोकप्रतिनिधी यांची अभद्र युती जबाबदार आहे.

रस्त्यांवरील खड्डे कायमस्वरूपी बुजले जाणार नाहीत याची काळजी ठेकेदार घेतो. कारण रस्त्यांवरील खड्डे हे ठेकेदारांसाठी भविष्यातील चरण्याचे कुरण असते. राजकीय नेते व अधिकाऱ्यांचे हात ठेकेदाराने आधीच ओले केले असल्याने ते ठेकेदाराच्या पापाकडे दुर्लक्ष करतात. रस्त्यांवरील खड्ड्यांबाबत नागरिकांनी तक्रार केली किंवा पत्रकारांनी आवाज उठवला की ठेकेदारामार्फत खड्ड्यांवर किरकोळ दुरुस्ती केली पण पाऊस आला की पुन्हा रस्त्यांवर खड्ड्यांचे साम्राज्य पसरते. रस्त्यांवर कितीही खड्डे पडले तरी आपले कोणी काही करू शकणार नाही असा विश्र्वास ठेकेदाराला असतो म्हणून तो रस्त्यांवरील खड्डे कायमस्वरूपी बुजवण्याची तसदी घेत नाही. वास्तविक ज्या रस्त्यांवर खड्डे पडले आहेत त्या रस्त्याच्या ठेकेदारावर कारवाई व्हायला हवी.

त्या ठेकेदाराला काळ्या यादीत टाकले पाहिजे इतकेच नाही तर त्या ठेकेदाराला गुणवत्तापूर्ण काम केल्याचे प्रमाणपत्र देणाऱ्या अधिकाऱ्यांवर देखील कारवाई व्हायला हवी. तेथील लोकप्रतिनिधींना देखील याबाबत जबाबदार धरले पाहिजे. त्या रस्त्याचा संपूर्ण खर्च या तिघांकडून वसूल करायला हवा. रस्त्यांवर पडणाऱ्या खड्ड्यांना या तिघांच्या अभद्र युतीस जबाबदार धरून या तिघांवर कारवाई करण्याची कडक भूमिका शासनाने घेतली तरच खड्डेमुक्त महाराष्ट्र हे स्वप्न प्रत्यक्षात येईल नाही तर हे स्वप्न स्वप्नच राहील.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुण,, ९९२२५४६२९५**

# काय बोलता राव ?

प्रशासकीय काळ असल्याने वित्त आयोगाचा निधीच नाही मग विकास कसा करणार ? निधी कसा व कोठून आणणार आहोत. मतदार संघात काय म्हणून जावे, पालकमंत्र्यानी कसे दौरे करावेत अशा तक्रारी खद्द मंत्री, पालकमंत्रीच करीत असल्याने विकासात अडचणी निर्माण झाल्या आहेत. मंत्री पेचात मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री तोऱ्यात अशीच अवस्था झालीय.

**काय बोलता राव,**

स्थानीक स्वराज्य संस्थाच्या निवडणूका लांबल्यात. जिल्हा परिषदा, पालीका, महापालीकावर प्रशासक नेमल्याने आहे त्या निधीवरच गाडी हाकलावी लागते आहे. निधीच नाही तर त्या, त्या मतदार संघाचा विकास कसा करावा, पालकमंत्र्यानी पालक जिल्ह्याचा कसा विकास, दौरा करावा अशी खंत ग्रामविकास मंत्री तथा लातूरचे पालकमंत्री गिरीष महाजन यानीच केला आहे. मग विकास कसा करणार, होणार हे एक कोडेच मग बोला दाजीबा.

# लोकमान्य बाळ गंगाधर टिळक आणि साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांना आ. रमेशआप्पा कराड यांच्याकडून विनम्र अभिवादन

लातूर – स्वराज्य हा माझा जन्म सिद्ध हक्क



आहे आणि तो मी मिळविणारच.अशी घोषणा देणारे भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे अग्रगण्य नेते लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त आणि आपल्या साहित्यातून समाजाला दिशा देणारे साहिद्धत्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त भाजपाचे नेते आ रमेशआप्पा कराड यांनी या दोन्ही थोर महापुरुषांना पुष्पांजली अर्पण करून विनम्र अभिवादन केले.

लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात महान स्वातंत्र्यसेनानी, उत्कृष्ट वक्ते, उत्तम समाजसुधारक, पत्रकार, लेखक लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथी आणि आपल्या लेखणीतून कष्टकरी, उपेक्षित वर्गाच्या वेदना जगासमोर मांडणारे साहिद्धत्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती भाजपा नेते आ रमेशआप्पा कराड यांनी पुष्पांजली अर्पण करून साजरी करण्यात आली यावेळी भाजपाचे गोविंद नरहरे, उमेश बेद्रे, सुरज शिंदे, अमर चव्हाण यांच्यासह अनेक जण होते.

# अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य नव्या पिढीने अभ्यासावे. भिक्खु पय्यानंद थेरो.

लातूर : लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे एकूण साहित्य बहुजन समाजाचे दुःख व वेदना, व्यथा मांडणारे दिशा दर्शक होते. त्या मुळे अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील परिवर्तनवादी विचाराचा जागर सर्वत्र झाला पाहिजे तसेच नवपिढीने अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य अभ्यासले पाहिजे असे प्रतिपादन भिक्खु पय्यानंद थेरो यांनी या वेळी केले.

अण्णाभाऊ साठे यांच्या १०४ व्या जयंती निमित्त साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या पूर्णाकृती स्मारक येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार घालून पु. भिक्खु पय्यानंद थेरो यांच्या उपस्थितीत अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी भंतेजी पुढे बोलताना म्हणाले की, लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांचा जीवन प्रवास हा अत्यंत खडतर संघर्ष में होता.



दीड दिवस शाळेमध्ये जाऊन अथांग बहुजन साहित्य निर्माण करणारे एकमेव व्यक्तिमत्व जगाच्या इतिहासात झाले आहेत. तेव्हा अण्णाभाऊ साठे यांच्या विचार कार्याची जयंती नव्या पिढीने साजरी करणे अपेक्षित आहे.

या वेळी मातंग समाज चलो बुद्ध कि ओर अभियानाचे प्रमुख मा. डी. एस. नरसिंगे यांनी जयंती पर शुभेच्छा देताना म्हणाले कि लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांचे एकूणच साहित्यातील तत्वज्ञान हे केवळ एका जातीपुरते मर्यादित नसून समस्त वंचित, पीडित गोरगरीब बहुजन समाजाच्या उन्नती व विकासासाठी होते.

या वेळी भंते बुद्धशील,प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे, प्राचार्य डॉ. संजय गवई यांनीही या वेळी जयंतीच्या शुभेच्छा दिल्या.

या प्रसंगी पु. भिक्खु पय्यानंद थेरो, पु. भंते बुद्धशील, पु. भंते मोग्गलायन, मातंग समाज चलो बुद्ध कि और चे प्रमुख मा.डी. एस.नरसिंगे, प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे, प्राचार्य डॉ. संजय गवई,अन्तेश्र्वर थोटे,ज्योतीराम लामतुरे,राजेंद्र हजारे,अनिरुद्ध बनसोडे,उदय सोनवणे,मिलिंद धावारे, मंगल कांबळे, आशा चिकटे, मंगल कांबळे ई. सह मोठया संख्येने धम्मसेवकांची उपस्थिती होती.

# कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव लोकशाहीर अण्णा भाऊ साठे याना जयंती निमित्ताने अभिवादन

बाभळगाव : दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ बाभळगाव द्वारा



संचलित कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव येथे लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीच्या निमित्ताने सांस्कृतिक विभागाच्या वतीने अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ . दुष्यंत कटारे होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला भूगोल विभाग प्रमुख डॉ. अभिजीत बादाडे यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. अगंद कोते तर आभार रासेयो कार्यक्रमाधिकारी दशरथ भिसे यांनी मानले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील स्टाफ सचिव डॉ. जयदेवी पवार, डॉ. वैशाली माढेकर, प्रा. बालिका गौंड, डॉ. नरेंद्र देशमुख, प्रा. चंद्रकांत मोरे, डॉ. अजित भांजी, डॉ. मा ना गायकवाड, प्रा. सुरेश बिराजदार विद्यार्थी प्रतिनिधी ओमकार सुरवसे,अवदुत पांचाळ, महेश माळी, ऋषिकेश सुरवसे, बालाजी सुरवसे, गणेश साखरे, ऐश्र्वर्या भोसले, सोनाली कोकाटे, नेहा डोंगरे, गायकवाड नेहा, मस्के अपेक्षा , ऋतुजा जांबळधरे, श्रीकांत कमले, कृष्णा धामणगावे, अभिषेक सौदागर उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नितीन पाटील आणि बालाजी देशमुख यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी, शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### वर्ल्ड ग्रीकल्चर फोरमतर्फे दुसरे जागतिक कृषी पारितोषक २०२४ महाराष्ट्राला जाहीर

मुंबई, :- युनोचे सरचिटणीस ॲण्टिवो गुट्रेस यांनी शाश्र्वत विकास, हवामान बदलाशी लढा आणि अन्न सुरक्षा सुनिश्र्चित करण्यासाठी तातडीने पाऊले उचलण्याचे आवाहन केले होते. मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या नेतृत्वातील महाराष्ट्र शासनाने या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. राज्यात पर्यावरण रक्षण, अन्न सुरक्षा यांच्या माध्यमातून शाश्र्वत विकास धोरण राबविली जात आहेत. या सर्व प्रयत्नांची आणि पर्यावरण, कृषी क्षेत्राच्या विकासासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उचलेल्या पावलांची दखल घेत वर्ल्ड ग्रीकल्चर फोरमचा २०२४ चा दुसरे जागतिक कृषी, पर्यावरण पारितोषिक महाराष्ट्राला जाहीर झाले आहे. फोरमच्या चेअरमन प्रा.रुडी रॅबिंग्ज यांनी पत्राद्वारे याबाबत माहिती दिली आहे. अमेरिकेतील वॉशिंग्टन डीसी येथे २६ ऑगस्ट रोजी या पुरस्काराचे वितरण करण्यात येणार आहेत. एक लाख डॉलरची पुरस्कार रक्कम, चांदीची ट्रॉफी आणि प्रमाणपत्र असे पुरस्काराचे स्वरुप आहे. या पुरस्कारांसाठी राज्यातील पर्यावरण रक्षण, अन्न सुरक्षा यांच्या माध्यमातून घेतल्या गेलेल्या शाश्र्वत विकास धोरणांची दखल घेतली असल्याची माहिती राज्याच्या कृषी मुल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल यांनी दिली आहे.

बांबू मिशन राबविण्याचा निर्णय

मुख्यमंत्री श्री. शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राने अनेक परिवर्तनकारी निर्णय घेतले आहेत. यात २१ लाख हेक्टर क्षेत्रावर देशातील सर्वात मोठे बांबू मिशन राबविण्याचा निर्णय आहे. नंदुरबार येथील धडगांव तालुक्यातील ७० गावच्या सरपंचांनी केंद्रीय फलोत्पादन सचिव प्रभातकुमार यांच्या समोरच आमचा प्रश्र्न बांबू लागवडीशिवाय सुटणार नाही, अशी मागणी केली. केंद्रानेही त्याला होकार दिला. या वर्षीच्या राज्याच्या अर्थसंकल्पात अर्थमंत्री श्री. पवार यांनी नंदुरबार जिल्ह्यातील एक लाख २० हजार एकर जमिनीवर केंद्र आणि राज्य मिळून हरित पट्टा निर्माण करण्याचे जाहीर केले आहे. या अभियानासाठी अर्थमंत्री म्हणून उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी अर्थसंकल्पातही तरतूद केली आहे. याशिवाय शासनाने १२३ प्रकल्पांना मार्गी लावून सुमारे १७ लाख हेक्टरची सिंचन क्षमता निर्माण करण्याचा चंग बांधला आहे.

परिवर्तनकारी निर्णय

भारतातील पहिले मायक्रो मिलेट क्लस्टर व बांबू क्लस्टर लातूर जिल्ह्यात लोदगा येथे सुरु करण्यास मागील अर्थसंकल्पात उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी मान्यता दिली होती. तसा प्रस्तावही केंद्राकडे पाठवण्यात आला आहे. पीएम किसान सन्मान निधी दुप्पट करण्याचा निर्णय घेणारे पहिले राज्य महाराष्ट्र ठरले आहे. याशिवाय लाखो शेतकऱ्यांना नॅनो-तंत्रज्ञान खतांचे वितरण करण्याची सुरवातही केली आहे. तृणधान्य अभियानात श्री अन्न म्हणून सावा, राळा-भुरका यांसह विविध तृणधान्यांना प्राधान्य देण्याचे धोरण तयार करण्यात आले आहे. त्यासाठी शंभर कोटी रुपयांची तरतूद करणारे महाराष्ट्र हे अव्वल राज्य ठरले आहे.

बांबू लागवडीसाठी अनुदान

अलिकडेच औष्णिक वीज केंद्रांनी बायोमासमध्ये बाबुंचाही वापर करावा, असे निर्देश दिले गेले आहेत. त्याचप्रमाणे बांबूपासून दैनंदिन जीवनात उपयोगात येणाऱ्या टुथब्रश, शेव्हिंग कीट यासारख्या वस्तू तयार करण्याला प्रोत्साहन देण्यात येत आहे. यामुळे प्लास्टीकचा कचरा कमी होण्यास मदत मिळणार आहे.

यासाठी बांबूची लागवड वाढणे आवश्यक असून त्याकरिता मिशन मोडवर काम होत आहे. बांबू लागवडीसाठी हेक्टरी सात लाख रुपयांचे अनुदान देणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे. शिर्डी आणि मुंबईसह शक्य त्या सर्वच विमानतळांच्या ठिकाणी कार्बन फुटप्रिंट कमी करण्याकरिता पोलाद आणि अन्य धातुंच्या ऐवजी बांबुचा वापर करण्यावर भर देण्याचेही राज्य सरकारने धोरण आखले आहे,असेही श्री. पटेल यांनी नमूद केले आहे. वर्ल्ड ग्रीकल्चर फोरमतर्फे २०१८ पासून हा पुरस्कार देण्यात येतो.

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात संगणकशास्त्राला अनन्यसाधारण महत्त्व-प्रभारी प्राचार्य डॉ.सिद्धेश्र्वर बेल्लाळे

लातूर : सध्याचे युग हे संगणकाचे युग असून प्रत्येक विद्यार्थ्यांचा ओढा संगणकशास्त्र विषयाकडे आहे. पूर्वीच्या शिक्षण पद्धतीपेक्षा राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात आज खूपच बदल झालेला आहे.या धोरणात विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा म्हणून कौशल्य विकासावर जास्तीचा भर देण्यात आलेला आहे.दयानंद शिक्षण संस्था व महाविद्यालयाची विद्यार्थी हा केंद्रबिंदू मानून दैदिप्यमान वाटचाल सुरू आहे.महाविद्यालयातील सुसज्ज ग्रंथालय,तज्ज्ञ व अनुभवी प्राध्यापक यांचा विद्यार्थ्यांना नक्कीच फायदा होईल.विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाची शिस्त पाळून प्रामाणिकपणाने,जिद्दीने व भरपूर अभ्यास करून करिअर घडविले पाहिजे.संगणकशास्त्र विषयाला अनन्यसाधारण महत्त्व असून संगणकाने संपूर्ण जगाला एका दोरीमध्ये बांधले आहे.संगणकशास्त्राच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाचे नावलौकिक जागतिक पातळीवर झळकावावे,असे प्रतिपादन महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.सिद्धेश्र्वर बेल्लाळे यांनी केले.



येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयातील संगणकशास्त्र विभागातर्फे दि.०१ऑगस्ट २०२४ रोजी इंडक्शन प्रोग्राम व बी.सी.एस.,डेटा सायन्स,सॉफ्टवेअर इंजिनिअरिंग आणि एम.एस्सी. संगणकशास्त्र प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या स्वागत समारंभ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले होते.यावेळी अध्यक्षीय समारोप करताना प्रभारी प्राचार्य डॉ.सिद्धेश्र्वर बेल्लाळे बोलत होते.याप्रसंगी संगणकशास्त्र विभाग प्रमुख डॉ.रोहिणी शिंदे, विभाग समन्वयक डॉ.संगीता जाजू,डॉ.युवराज सारणीकर, डॉ.विजेंद्र चौधरी,प्रा.मेघा पंडित, डॉ.गजानन बने,ग्रंथपाल प्रा.किरण भिसे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी डॉ.रोहिणी शिंदे यांनी संगणकशास्त्र विभागाची ओळख करून देऊन बी.सी.एस.ची मिळालेली वाढीव तुकडी,नव्याने सुरू झालेले डेटा सायन्स व सॉफ्टवेअर इंजिनिअरिंग या विषयीचे महत्त्व त्यांनी सांगितले.डॉ.युवराज सारणीकर यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे विद्यार्थ्यांच्या कौशल्यवाढीसाठी व विद्यार्थ्यांच्या अष्टपैलू व्यक्तिमत्व वाढीसाठी किती महत्त्वपूर्ण आहे हे सांगितले.डॉ.विजेंद्र चौधरी यांनी एनएसएस,एनसीसी व युवक महोत्सवाविषयी माहिती सांगितली. प्रा.मेघा पंडित यांनी साहित्य आणि सांस्कृतिक मंडळाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना कसा वाव दिला जातो याविषयी माहिती दिली.ग्रंथपाल प्रा.किरण भिसे यांनी ग्रंथालय व कमवा आणि शिका याविषयी व डॉ.संगीता जाजू यांनी मुलींच्या सुरक्षेच्या दृष्टीने महिला तक्रार निवारण समितीच्या कार्याविषयी माहिती सांगितली.

प्रास्ताविक प्रा.वैभव कुलकर्णी यांनी केले तर आभार सृष्टी पलमटे हीने मानले.सूत्रसंचालन गौरी जाजू व आकांक्षा पाटील या विद्यार्थीनीने संयुक्तरित्या केले.याप्रसंगी संगणकशास्त्र विभागातील प्रा.अरुणा चौधरी, प्रा.पूजा नंदगावे,प्रा.सुमित जोशी,प्रा. विजय पवार,प्रा.शहाजिया फरीन,प्रा.प्रतीक मुसमाडे,प्रा.आदित्य सूर्यवंशी,प्रा.दीपाली दाडगे,डॉ. रामशेट्टी शेटकार,प्रियंका हिप्परकर,राहुल बनभेरू,मानसी गायकवाड,छाया केसाळे, राजेसाहेब पांचाळ,हरिओम पाटोळे,पांडुरंग यमपुरे यांच्यासह इतर प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.यावेळी संगणकशास्त्र विभागातील प्रथम वर्षातील सर्वच विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले.प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांबरोबर द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देत इंडक्शन व स्वागत समारंभ कार्यक्रम हर्षोल्हासात संपन्न झाला.

# मळवटी येथे समाज मंदिराचे आ. रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते भूमिपूजन

लातूर – थोर महापुरुषांच्या नावाने आपल्या भारत देशाची जगात ओळख असून महापुरुषांच्या त्यागातून बलिदानातून, शिकवणीतून आणि विचारातून देश, समाज प्रगती करत आहे. लोकशाहीर, साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांनी अत्यंत हालाखीच्या परिस्थितीत साहित्याची निर्मिती केली त्या साहित्यातून समाज परिवर्तन केले अशा या थोर अण्णाभाऊ साठे यांचा शासनाने भारतरत्न पुरस्कार देऊन मान सन्मान करावा यासाठी आपण मा. मुख्यमंत्री, मा. पंतप्रधान साहेब यांच्याकडे पाठपुरावा करू असे भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी बोलून दाखविले.



लोकशाहीर साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे जयंती निमित्ताने लातूर तालुक्यातील मौजे मळवटी येथे भाजप नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या शुभहस्ते अण्णाभाऊ साठे समाज मंदिर बांधकामाचे भूमिपूजन, जयंती उत्सवाचे ध्वजारोहण, गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार आणि ज्येष्ठ नागरिकांचा व मान्यवरांचा फकीरा कादंबरी देऊन सन्मान करण्यात आला कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच गोविंद गरड हे होते. याप्रसंगी प्रसिद्ध कवी संजीवकुमार भोसले, ॲड सिद्धार्थ सोनवणे, गोविंद नरहरे, उपसरपंच श्रीकांत बैले, उमेश बेद्रे, सुरज शिंदे, प्रताप पाटील, लक्ष्मण नागिने सचिन साबदे, मारुती शिंदे, डॉ. अभय कदम, राजपाल जाधव, सुधाकर शिंदे, महेश वाघमारे, जगद्गुरु संत तुकोबाराय साहित्य परिषदेचे ब्रिजलाल कदम यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती.

मळवटी येथील जयंती उत्सव समितीच्या वतीने घेण्यात आलेल्या विविध उपक्रमाचे कौतुक करून यावेळी बोलताना आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, गौतम बुद्ध, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, छत्रपती राजश्री शाहू महाराज, डॉ बाबासाहेब आंबेडकर, अण्णाभाऊ साठे, महात्मा गांधी यासह अनेक थोर महापुरुष या देशात जन्माला आले नसते तर देश आणि समाज कुठे गेला असता असा प्रश्र्न उपस्थित करून केवळ महापुरुषांच्या विचाराने देशाची प्रगती होत आहे, समाज पुढे जात आहे. देशाची वैभव जगात दिसत आहे. थोर पुरुषाच्या विचाराचे आचरण प्रत्येकाने आपल्या जीवनात करावे असेही आव्हान यावेळी त्यांनी केले.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील प्रत्येक गावागावात वाडी वस्तीत विविध विकास कामासाठी आमदार निधी बरोबरच शासनाच्या विविध योजनेतून मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला अनेक मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी निधी मिळवून दिला असे सांगून आ. रमेशआप्पा कराड यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्र शासनाने आणि राज्यातील महायुती शासनाने प्रत्येक घटकांना न्याय देण्याची भूमिका घेऊन शेतकरी सन्मान योजना, मोफत राशन, मुख्यमंत्री लाडकी बहीण, एक रुपयात पिक विमा, घरकुल, शुद्ध पाणीपुरवठा योजना, महिलांना प्रवासात सवलत, यासह विविध योजना सुरू केल्या असल्याची माहिती दिली. या सर्व योजना राबवताना कुठेही दलाल राहणार नाही याची काळजी घेऊन लाभार्थ्यांना योजनेचा थेट लाभ मिळत असल्याचेही त्यांनी बोलून दाखविले.

यावेळी अनेक मान्यवरांनी आपले विचार व्यक्त करून अण्णाभाऊ साठे यांच्या कार्यावर प्रकाश टाकला. मळवटी येथील ग्रामस्थांनी वाजत गाजत आ. कराड यांचे जोरदार स्वागत केले. या कार्यक्रमास मळवटी आणि परिसरातील तुकाराम कलवले, गणपत शिंदे, अंगद येचवाड, लिंबराज बोळंगे, गणेश दुपटे, विनोद शिंदे, देवानंद गायकवाड, शरद शिंदे, किशोर पाटील, अहमद शेख यांच्यासह समाज बांधव गावातील नागरिक भाजपा कार्यकर्ते पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संवाद यात्रेने ढवळणार, राज्य प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांची घोषणा

मुंबई : ९ ते ११ ऑगस्ट दरम्यान भाजपा संवाद यात्रेच्या माध्यमातून संपूर्ण राज्य ढवळून काढणार असल्याची घोषणा भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष आमदार श्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली. संवाद यात्रेदरम्यान राज्यातील मंडल स्तरावरील ७५० ठिकाणी भाजपाचे अधिवेशन होईल व राज्यात पुन्हा महायुतीचेच सरकार येईल, असा विश्र्वास व्यक्त केला.

श्री बावनकुळे म्हणाले, भाजपाच्या ६९ संघटनात्मक जिल्ह्याच्या ठिकाणी जिल्हास्तरीय अधिवेशनासाठी महाराष्ट्रातील ३६ नेते मुक्कामी जात आहेत. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस नागपूर महानगर, नागपूर ग्रामीण व अमरावती येथे तर मी स्वत: वर्धा व भंडारा येथे अधिवेशनात सहभागी होणार आहे. या माध्यामातून राज्यातील महायुती सरकार व केंद्रातील मोदी सरकारच्या योजनांची माहिती आम्ही समाजातील अखेरच्या माणसापर्यंत पोहचविण्यासाठी संवाद यात्रा करणार आहोत.

देवेंद्रजी उत्कृष्ट संघटक

महाराष्ट्राचे नेते उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे उत्कृष्ट संघटक आहेत. शासन-प्रशासनात काम करण्याचा त्यांचा मोठा अनुभव आहे. त्यांचा संघटनेला मोठा फायदा आहे. त्यांना राष्ट्रीय अध्यक्ष करण्याबाबतचा निर्णय केंद्रीय नेतृत्त्व घेईल. तो निर्णय आम्हा सर्वांना मान्य असेलच. मात्र, राज्यातील १४ कोटी जनतेच्या कल्याणासाठी फडणवीसांचे शासनातील व संघटनेतील स्थान महत्वाचे आहे.



आम्हाला तर ते महाराष्ट्रात राहावे असेच वाटते.

डीपीसीच्या पैशातून काँग्रेसने मेळावे घेतले

नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी डीपीसीमधून विकासकामांसाठी निधी दिला. काँग्रेसच्या लोकप्रतिनिधींनी या निधीचा वापर राजकीय कारणासाठी व पक्षाचे मेळावे घेण्यासाठी केला. आरोग्य आणि महिला बाल कल्याण विभागाचे मेळावे पक्षासाठी घेण्यात आले. जनतेचा पैसा खर्च केला, असा आरोप श्री बावनकुळे यांनी केला.

नागपूरच्या विकासासाठी १२०० कोटीचा निधी महायुतीचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांनी विकासासाठी मोठा निधी दिला आहे. ७५ विभागातून जिल्हाचा विकास होणार आहे. शुक्रवारी उपमुख्यमंत्री फडणवीस हे जिल्ह्यातील ३ प्राथमिक आरोग्य केंद्र व कामगारांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी १३ ठिकाणी तालुका कामगार केंद्राचे उद्घाटन करणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

– ते असेही म्हणाले –

मविआचे सरकार आले तर लाडकी बहिण, शेतकऱ्यांना मोफत वीज यासह महायुती सरकारच्या व मोदी सरकारच्या योजना बंद करणार.

उद्धव ठाकरे यांनी आणलेलं सगळे प्रस्ताव फडणवीस यांनी मुख्यमंत्री काळात मंजूर केले होते.

उद्धव ठाकरे या चिंतेत आहेत की मुंबई आणि कोंकणातून त्यांचे व्होट गेले. भाजपसोबत असताना शिवसेनेचे १८ खासदार निवडुन येत होते. ठाकरे यांनी पंतप्रधान मोदींविषयी खोटा प्रचार केला.

महायुती मध्ये कोणती जागा कोण लढणार हा निर्णय युतीमधील तिन्ही पक्षाचे नेते व भाजपाचे केंद्रीय नेतृत्व घेणार.

# मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेमुळे युवकांना मिळेल रोजगाराभिमुख प्रशिक्षण

राज्यातील युवकांना त्यांच्या शिक्षणानंतर प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण देऊन नोकरी मिळण्याची त्यांची क्षमता वाढविण्यासाठी 'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना' सुरू करण्यात आली आहे. या माध्यमातून उद्योजक, खासगी क्षेत्रातील आस्थापना, सेवा क्षेत्र, केंद्र व राज्य शासनाच्या शासकीय तथा निमशासकीय आस्थापनांना मनुष्यबळ मिळणार आहे. यासाठी इयत्ता बारावी पास प्रशिक्षणार्थींना ६ हजार रुपये, आयटीआय, पदविकाधारक प्रशिक्षणार्थींना ८ हजार रुपये आणि पदवीधर, पदव्युत्तर प्रशिक्षणार्थींना १० हजार रुपये प्रतिमाह विद्यावेतन मिळणार आहे.

शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग आणि मुख्यमंत्री जनकल्याण कक्ष यांच्यामार्फत संयुक्तपणे 'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना' राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत खाजगी क्षेत्रातील आस्थापना, उद्योजकाकडे एकूण कार्यरत मनुष्यबळाच्या १० टक्के व सेवा क्षेत्रासाठी २० टक्के इतके उमेदवार कार्य प्रशिक्षणसाठी घेता येतील. केंद्र व राज्य शासनाच्या शासकीय, निमशासकीय आस्थापना, उद्योग, महामंडळ यामध्ये मंजूर पदाच्या ५ टक्के किंवा किमान एक उमेदवार कार्य प्रशिक्षणासाठी घेता येतील.

लघु आणि मध्यम व मोठे उद्योग, शासकीय, निमशासकीय आस्थापना, महामंडळ, आणि विविध आस्थापना यांना आवश्यक असलेल्या मनुष्यबळाची मागणी https://rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने नोंदवावी. किमान २० रोजगार देणाऱ्या आस्थापना या कार्यप्रशिक्षणामध्ये सहभागी होण्यासाठी पात्र असतील. या कार्य प्रशिक्षण योजनेंतर्गत प्रशिक्षणार्थींना त्यांच्या शैक्षणिक अर्हतेप्रमाणे विभागामार्फत विद्यावेतन दिले जाईल. प्रशिक्षणादरम्यान प्रशिक्षणार्थीची दैनिक हजेरी संबंधित आस्थापना, उद्योग यांच्याकडून ऑनलाईन पद्धतीने घेण्यात येईल. या ऑनलाईन उपस्थितीच्या आधारे प्रशिक्षणार्थीचे विद्यावेतन प्रशिक्षणार्थीच्या थेट बँक खात्यात (डीबीटी) ऑनलाईन पद्धतीने दरमहा अदा करण्यात येणार आहे.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी https://rojgar.mahaswayam.gov.in या वेबपोर्टलला भेट देवून योजनेमध्ये सहभागी होता येणार आहे. या वेबपोर्टलवर यापूर्वी उमेदवार किंवा आस्थापना, उद्योगांनी नोंदणी केलेली असल्यास उमेदवारांसाठी (उमेदवारांनी आपला रजिस्ट्रेशन क्रमांक व पासवर्डने लॉगीन करून आपली प्रोफाईल अपडेट करावी, व इतर तपशील मध्ये आपली माहिती उदा. बँकेचे नाव, आयएफएससी कोड, खाते क्रमांक, शाखा कोड, व आपले रहिवासी प्रमाणपत्र, शैक्षणिक पात्रतेचे प्रमाणपत्र, व कॅन्सल चेक अपलोड करावे.) आणि आस्थापना, उद्योगांसाठी (आस्थापना, उद्योगांनी आपला रजिस्ट्रेशन क्रमांक व पासवर्डने लॉगीन करून ईपीएफ, ईएसआयसी, जीएसटी, सर्टिफिकेट ऑफ इन्कॉर्पोरेशन, डीपीआयटी व उद्योग आधार आदी माहितीसह आपल्या आस्थापनेची प्रोफाईल अपडेट करावी.)

**संकलन- जिल्हा माहिती कार्यालय, लातूर**

## दयानंद विज्ञान महाविद्यालयात वैज्ञानिक जीन लामार्क आणि जॉर्ज हेवेसी यांची जयंती साजरी

लातूर: येथील दि.०१ ऑगस्ट २०२४ रोजी वैज्ञानिक



' जीन लामार्क यांची २८० वी आणि जॉर्ज हेवेसी यांची १३९वी' जयंती साजरी करण्यात आली.तसेच जागतिक फुफ्फुसाचा कर्करोग दिवस दरवर्षी १ ऑगस्ट रोजी जगभरातील व्यक्ती आणि समुदायांवर होणाऱ्या परिणामांबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी पाळला जातो.महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.सिद्धेश्र्वर बेल्लाळे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम पार पडला.कार्यक्रमाची सुरुवात प्रा. डॉ.कोमल गोमारे,बी. एस्सी.प्रथम वर्षातील बागवान नमिरा आणि द्वितीय वर्षातील आर्यन गिरवलकर यांनी वैज्ञानिकांच्या प्रतिमेस वंदन करून केली.जैवतंत्रज्ञान विभागातील प्रा.श्र्वेता मदने यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना केली. डॉ.कोमल गोमारे वैज्ञानिक जयंतीच्या प्रसंगी बोलत असताना म्हणाल्या की,संशोधन गुणांसोबतच विद्यार्थ्यांनी सर्वांगीण विकास देखील करावा.प्रथम वर्ष असो वा द्वितीय विद्यार्थी स्वइच्छेने विविध उपक्रमात सहभागी होत आहेत. त्यामुळे त्यांच्यामधला आत्मविश्र्वास वाढत चालला आहे व त्यासाठी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

जैवतंत्रज्ञान विभागातील बी.एस्सी.प्रथम वर्षातील बागवान नमिरा यांनी सांगितले की,जीन-बॅप्टिस्ट पियरे एंटोइन डी मोनेट,शेव्हलियर डी लामार्क यांचा जन्म ०१ ऑगस्ट १७४४ रोजी झाला.ते सहसा लामार्क म्हणून ओळखले जातात,ते फ्रेंच निसर्गवादी,जीवशास्त्रज्ञ,शैक्षणिक आणि सैनिक होते.जैविक उत्क्रांती नैसर्गिक नियमांनुसार झाली आणि पुढे गेली या कल्पनेचे ते सुरुवातीचे समर्थक होते आणि मृत्यू १८ डिसेंबर १८२९ रोजी झाला. जैवतंत्रज्ञान विभागातील बी.एस्सी.द्वितीय वर्षातील आर्यन गिरवलकर यांनी सांगितले की,जॉर्ज चार्ल्स डी हेवेसी यांचा जन्म ०१ ऑगस्ट १८८५ रोजी झाला.एक हंगेरियन रेडिओकेमिस्ट आणि रसायनशास्त्रातील नोबेल पारितोषिक विजेते होते,त्यांना १९४३ मध्ये प्राण्यांच्या चयापचयसारख्या रासायनिक प्रक्रियांचा अभ्यास करण्यासाठी किरणोत्सर्गी ट्रेसर्सच्या विकासात महत्त्वाच्या भूमिकेसाठी मान्यता मिळाली होती.त्याने हाफनियम या मूलद्रव्याचाही सहशोध लावला व मृत्यू ५ जुलै १९६६ रोजी झाला. याप्रसंगी महाविद्यालयातील प्रा.अवंती बिडकर,प्रा. अनुराधा शिंदे,प्रा.स्वरूप गावकरे,डॉ.नितीन चौहान तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी बाळासाहेब चौगुले,विशाल टार्फे,लक्ष्मण शिंदे, अशोक मदने तसेच बी.एस्सी.जैवतंत्रज्ञान विभागातील प्रथम,द्वितीय आणि तृतीय वर्षातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### राज्यात १ कोटी ६५ लाख ७० हजार ४३७ पीकविमा अर्ज दाखल; लाखो शेतकऱ्यांनी एक रुपयात भरला आपला पीकविमा – कृषिमंत्री धनंजय मुंडे

मुंबई, : खरीप हंगाम २०२४ साठी प्रधानमंत्री पिक विमा योजनेंतर्गत पिकांचा विमा भरण्याची अंतिम मुदत बुधवार ३१ जुलै रोजी संपुष्टात आली असून ३१ जुलै अखेर राज्यातून १ कोटी ६५ लाख ७० हजार ४३७ पीक विमा अर्ज पीक विमा पोर्टलवर दाखल झाले आहेत. याद्वारे लाखो शेतकऱ्यांनी पीक १ रुपया विमा हप्ता भरून पीक संरक्षित केले असल्याची माहिती कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी दिली आहे. प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत पीक विमा पोर्टलच्या वतीने सुरुवातीला १५ जुलै ही अंतिम मुदत देण्यात आली होती, मात्र, श्री. मुंडे यांनी केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांना विनंती करून ३१ जुलै पर्यंत मुदतवाढ करून घेतली होती.

**काळी शाळा ..**

कसाकरू भ्रष्टाचार
काढा चांगलीशाळा
सगळे सिस्टिमॅटीक
डाग न लागो काळा
मनी लाँड्रीग करता
कायदे नियम पाळा
पोलिसाचाससेमिरा
अगदी सहज टाळा
नको क्रिमीनल नोंद
नकोयं काळा टिळा
मुक्त फिरा गुन्हेगारां
तुरूगांस लाव टाळा
अटकपूर्व जामीनास
नकात करु कंटाळा
विक्रमादित्य चाणाक्ष
सुयोग्य उत्तरे वेताळा
काळापैसा हो सफेद
ऐशाआरामात लोळा
राज कारणात प्रवेश
मुख्यखुर्च्यांवर डोळा
वकील नामक भुजंग
घालूनबसला वेटोळा
गुन्ह्यात करे पीएचडी
सहज पचवा घोटाळा

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

## नाशिक-मुंबई महामार्गावरील रस्त्यांची कामे जलदगतीने पूर्ण करावीत : पालकमंत्री दादाजी भुसे

नाशिक, (जि. मा. का. वृत्तसेवा): नाशिक- मुंबई



महामार्गावरील रस्त्यांच्या कामांसह इतर अनुषंगिक कामे तातडीने पूर्ण करण्याबाबत राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मुंबई येथे झालेल्या बैठकीत दिलेल्या निर्देशांचे पालन करण्यात येवून, येत्या दहा दिवसांच्या कालावधीत कामे पूर्ण करण्याच्या सुचना राज्याचे सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री दादाजी भुसे यांनी बैठकीत दिल्या.

आज जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मध्यवर्ती सभागृहात नाशिक- मुंबई राष्ट्रीय महामार्गाबाबत शहरातील विविध संघटनांसमवेत झालेल्या बैठकीत पालकमंत्री श्री. भुसे बोलत होते. या बैठकीस विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, जिल्हाधिकारी जलज शर्मा, जिल्हा पोलीस अधीक्षक विक्रम देशमाने, उपवनसंरक्षक पंकज गर्ग यांच्यासह विविध संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

पालकमंत्री दादाजी भुसे म्हणाले, पावसामुळे महामार्गावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले असून वाहनधारकांना प्रवास करतांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. तसेच यामुळे वाहतुकीची कोंडीही होत आहे. नाशिक ते मुंबई हा प्रवास करण्यासाठी नियमित वेळेपेक्षा दुप्पट वेळ लागत आहे. त्यामुळे या महामार्गाच्या दुरूस्तीची कामे येत्या दहा दिवसांत पूर्ण करण्यात यावे व या कामात कोणत्याही प्रकारची दिरंगाई होता कामा नये, असे निर्देश पालकमंत्री दादाजी भुसे यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना या बैठकीत दिले.

विविध संघटनांच्या पदाधिकारी यांनी या बैठकीत नाशिक-मुंबई महामागप्रवरील खड्ड्यामुळे वाहतुकीस येणाऱ्या अडचणी सांगितल्या. तसेच रस्ता दुरूसत होईपर्यंत रस्त्याचा टोल घेवू नये, अशी मागणी देखील यावेळी त्यांनी पालकमंत्री दादाजी भुसे यांच्याकडे केली.

### महाराष्ट्र ग्रीबिझनेस नेटवर्क (मॅग्नेट) प्रकल्पांतर्गत आशियाई विकास बँकेच्या शिष्टमंडळाचा महाराष्ट्र दौरा संपन्न

मुंबई : आशियाई विकास बँकेच्या अर्थसहाय्याने राबविण्यात येत असलेल्या महाराष्ट्र ग्री बिझनेस नेटवर्क (मॅग्नेट) प्रकल्पाच्या कामकाजासंदर्भात आढावा घेण्यासाठी आशियाई विकास बँकेचे शिष्टमंडळ दौऱ्यावर आले होते. या शिष्टमंडळामध्ये आशियाई विकास बँकेचे वरिष्ठ संचालक क्यूंगफेंग झँग, देशातील मुख्यालयाच्या प्रमुख मिओ ओका तसेच यास्मिन सिद्धीकी, ताकेशी यूएडा, अलेक्सीया मायकेल्स, नारायण अय्यर, विकास गोयल, कृष्णन रौटेला, राघवेंद्र एन. यांचा समावेश होता.

# माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी प्रदेश काँग्रेस नेत्यांच्या प्रमुख उपस्थितीत लातूर येथे होणाऱ्या बैठकीच्या पूर्व तयारीचा घेतला आढावा

**लातूर प्रतिनिधी : आगामी विधानसभेच्या निवडणुकीबाबत लातूर, धाराशिव, बीड जिल्हा काँग्रेस कमिटीच्या पूर्वतयारीचा आढावा घेण्यासाठी महाराष्ट्राचे प्रभारी रमेश चेन्निथला यांच्या मार्गदर्शनाखाली, प्रांताध्यक्ष नानाभाऊ पटोले, यांच्या अध्यक्षतेखाली विधिमंडळ पक्षनेते बाळासाहेब थोरात व विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांच्या प्रमुख उपस्थितीत दि. १० ऑगस्ट, २०२४ लातूर येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी गुरुवार दि. १ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी लातूर शहरातील काँग्रेस भवन येथे या बैठकीच्या पूर्व तयारीचा लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीकडून आढावा घेऊन संबंधितांना आवश्यक सूचना केल्या.**

यावेळी यावेळी लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण जाधव, मोईजभाई शेख, माजी महापौर दीपक सूळ, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस मोइज शेख, माजी नगराध्यक्ष लक्ष्मण कांबळे, विलास को-ऑपरेटिव्ह बँकेचे व्हाईस चेअरमन समद पटेल, माजी महापौर स्मिता खानापुरे, रविशंकर जाधव, फारुक शेख, प्रा.प्रवीण कांबळे, इमरान सय्यद, प्रवीण सूर्यवंशी, सचिन बंडापल्ले, सपनाताई किसवे, व्यंकटेश पुरी, गिरीश पाटील, विजयकुमार साबदे, खाजाबानो बुऱ्हाण, केशरताई महापुरे, कैलास कांबळे, अहेमदखान पठाण, अँड. देविदास बोरूळे पाटील, सुपर्ण जगताप, आसिफ बागवान, धोंडीराम यादव, बाळासाहेब देशमुख, आयुब मणियार, युनूस मोमीन, तबरेज तांबोळी, दगडूअप्पा मिटकरी, गणेश देशमुख, सुभाष घोडके, पुनीत पाटील, अमित जाधव, प्रवीण घोटाळे, जालिंदर बर्डे, सुंदर पाटील कव्हेकर, धनंजय शेळके, लक्ष्मीनारायण नावंदर, डॉ. आनंद पवार, डॉ. बालाजी सोळुंके, गोरिबी बागवान, विकास

वाघमारे, रत्नदीप अजनीकर, महेश काळे, शेख कलीम, सुलेखाताई कारेपूरकर, संजय ओव्हळ, विजय गायकवाड, खाजमीया शेख, युनूस शेख, विजयकुमार धुमाळ, शितलताई मोरे, अँड.अंगदराव गायकवाड, अकबर माडजे, पवनकुमार गायकवाड, सिराज शेख, रामकिसन मदने, रईस टाके, अँड. सुनीत खंडागळे, राजू गवळी, पवन सोलंकर, मैनुद्दीन शेख, निजामुद्दीन शेख, महेश कोळे, अभिषेक पतंगे, अभिजित इगे, अमोल गायकवाड, किरण बनसोडे,






**विरोधी पक्षनेते मा.खा.श्री.राहुलजी गांधी यांचा अपमान केला, लातूर काँग्रेसकडून जाहीर निषेध सर्व समाज घटकांना लोकसंख्येच्या प्रमाणात न्याय व हक्क मिळावेत यासाठी जातनिहाय जनगणना करणे गरजेचे आहे. काँग्रेस पक्ष व इंडिया आघाडीतील मित्र पक्ष जातनिहाय जनगणना करण्यास कट्टीबद्ध आहेत परंतु भारतीय जनता पक्षाचा जातनिहाय जनगणनेला तीव्र विरोध आहे. विरोधी पक्षनेते मा. खा. श्री. राहुलजी गांधी यांनी लोकसभेत जातनिहाय जनगणनेचा मुद्दा मांडल्याने चातुर्वर्ण्य व्यवस्थेतच्या विचारधारेतून आलेल्या भाजपाच्या अनुराग ठाकूरनी मा.खा.श्री.राहुलजी गांधींची जात विचारून त्यांचा अपमान केला आहे. जात व धर्माच्या आधारावर राजकारण करणे हाच भाजपाचा अजेंडा आहे. याचा निषेध करण्यासाठी माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत लातूर जिल्हा व लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने आज काँग्रेस भवन येथे लोकसभेतील विरोधी पक्षनेते खासदार राहुल गांधी यांची जात विचारणाऱ्या भारतीय जनता पार्टीचा जाहीर निषेध आंदोलन करून करण्यात आला.**

युसूफ बाटलीवाला, गिरीश ब्याळे, शिवाजी कांबळे, हमीद बागवान, बाप्पा मार्डीकर, धनराज गायकवाड, शहाबाज खान, राजकुमार माने, अक्रम बोरीकर, रोहित वडरुले, शैलेश बोइननाड, जय ढगे, करीम तांबोळी, इस्माईल शेख आदीसह काँग्रेस पक्षाचे सर्व फ्रंटल ऑर्गनायझेशनचे अध्यक्ष, सर्व प्रभाग अध्यक्ष, महानगरपालिकेचे माजी नगरसेवक, पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

प्रारंभी माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख व मान्यवरांनी काँग्रेस भवन येथे साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून विनम्र अभिवादन केले. माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख शवेळी म्हणाले की, काँग्रेस पक्षाच्या मराठवाड्यातील नूतन खासदारांचा सत्कार समारंभाचे आयोजन लातुरात काँग्रेसच्या आढावा बैठकीच्या दिवशी करण्यात आले आहे. लोकसभेला सर्वांच्या सहकार्याने यश मिळाले खासदार डॉ. शिवाजी काळगे निवडून आले, यात लातूर शहराने सर्वाधिक मताधिक्य दिले. आता सर्वांनी विधानसभा निवडणुकीच्या कामाला लागावे, महाराष्ट्रात परिवर्तन होऊन महाविकास आघाडीचे सरकार सत्तेवर येईल यात मराठवाड्याचा वाटा सर्वाधिक असला पाहिजे.

प्रदेश काँग्रेस कमिटीच्या सूचनेनुसार लातूर येथे १० ऑगस्ट रोजी लातूर धाराशिव बीड या तीन जिल्ह्यांच्या आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. त्याच दिवशी टाऊन हॉलला मोठी सभा होईल, लातूरची संस्कृती बंधुभावाचा कोणालाही विसर पडता कामा नये आपण सर्वजण काम करून काँग्रेस पक्षाला गतवैभव मिळवून देऊया असेही त्यांनी सांगितले. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस मोइज शेख यांनी लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना उद्देशून अपमान कारक वक्तव्य केल्याबद्दल भाजप नेते केंद्रीय मंत्री अनुराग ठाकूर व भारतीय जनता पार्टी यांच्या निषेधाचा ठराव मांडला. या ठरावाला माजी महापौर दीपक सूळ यांनी अनुमोदन दिले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शरद देशमुख यांनी केले तर शेवटी आभार माजी नगराध्यक्ष लक्ष्मण कांबळे यांनी मानले.

# औशाच्या शेत तिथे रस्ता अभियानाअंतर्गत कामाची सोलापूर जिल्ह्याच्या उपजिल्हाधिकारीच्या चमूकडून पाहाणी...

औसा - शेतरस्ता पाणी आणि वीज शेतीच्या मूलभूत गरजा असून, ग्रामीण भागातील बहुतांश शेतरस्ते सहसा अतिक्रमणाने ग्रस्त आणि भांडणतंट्याचे केंद्र बनले आहेत. कायम दुर्लक्षित राहिलेल्या शेतरस्त्यांच्या मूलभूत प्रश्नांकडे आस्थापूर्व विशेष लक्ष देवून आमदार अभिमन्यू पवार यांनी 'शेत तिथे रस्ता' अभियान हाती घेत या विषयात संपूर्ण राज्यात 'औसा पॅटर्न' निर्माण केल्या असून हा पॅटर्न पाहण्यासाठी राज्यभरातून प्रशासकीय अधिकारी व लोकप्रतिनिधी येत आहेत.(दि.३१) जुलै रोजी सोलापूर जिल्ह्याच्या उपजिल्हाधिकारी चारुशीला देशमूख - मोहिते यांच्यासह एका चमूने या कामाची औसा तालुक्यातील हसलगन येथे पाहणी केली.



आ. अभिमन्यू पवार यांनी दोन वर्षातवदार आपल्या औसा १३०० किमी. पेक्षा अधिक लांबीचे शेतरस्ते अतिक्रमणमुक्त करून शेतकऱ्यांच्या अडचणी दूर केल्या आहेत. शिवाय शासकीय योजनांमधून शेतकऱ्यांना कृषिपूरक सुविधा उभारून देण्याचा संकल्प करून त्यांनी मनरेगातून ग्रामसमृद्धीचाही औसा पॅटर्न करून दाखविला आहे. शेतकऱ्यांना फळबागा, शेततळे आदी घटकांचा लाभ मिळवून दिला असून, आ. पवार यांच्या या अभियानामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढले आहे.

आमदार अभिमन्यू पवार यांनी केलेल्या या कामाची पाहणी करण्यासाठी राज्यातील विविध जिल्ह्यातून लोकप्रतिनिधी व प्रशासकीय अधिकारी भेट देत आहेत. बुधवारी औसा तालुक्यातील हसलगन येथे सोलापूर जिल्ह्याच्या उपजिल्हाधिकारी चारुशीला देशमूख - मोहिते यांच्यासह एका चमूने शेतरस्ते, गाव अंतर्गत रस्ते, शाळेचे मैदान, आदी कामाची पाहणी करून झालेल्या कामाबद्दल समाधान व्यक्त केले याचबरोबर शेतकऱ्यांच्या दृष्टीने हिताच्या औसा पॅटर्न दिशादर्शक ठरणारा असून सोलापूर जिल्ह्यात राबविण्याच्या दुष्टीने प्रयत्न केले जातील असे यावेळी उपजिल्हाधिकारी चारुशीला देशमूख - मोहिते यांनी सांगितले.यावेळी गटविकास अधिकारी युवराज म्हेत्रे, उपअभियंता सुर्यवंशी, सरपंच गोविंद कोराळे, उपसरपंच गोपाळ शिंदे आदीसह ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थ उपस्थित होते.

# महाराष्ट्र शासनाचे १०, १५, २० आणि २५ वर्षे मुदतीचे १ हजार ५०० कोटी रुपयांचे रोखे विक्रीस

मुंबई, : महाराष्ट्र शासनाच्या दहा वर्षे मुदतीच्या १ हजार ५०० कोटी रुपयांच्या रोख्यांची विक्री १६ मे २०१९ रोजीच्या अटी आणि शर्तींच्या अधीन राहून लिलावाने करण्यात येईल. या कर्जाद्वारे मिळालेल्या रकमेचा विनियोग शासनाच्या विकास कार्यक्रमासाठी केला जाईल, अशी माहिती वित्त विभागाच्या सचिव शैला ए. यांनी पत्रकान्वये दिली आहे.

अस्पर्धात्मक लिलाव पद्धतीनुसार (सुधारित) कर्जरोखे रकमेच्या दहा टक्के रक्कम पात्र वैयक्तिक व संस्थात्मक गुंतवणूकदारांना वाटप करण्यात येईल. मात्र, एका गुंतवणूकदारास एकूण अधिसूचित रकमेच्या जास्तीत जास्त एक टक्का रकमेच्या मर्यादेपर्यंतच वाटप करण्यात येईल. ६ ऑगस्ट २०२४ रोजी भारतीय रिझर्व्ह बँकेतर्फे मुंबई येथील कार्यालयात लिलाव केला जाईल, तर लिलावाचे बीडस् ६ ऑगस्ट २०२४ रोजी संगणकीय प्रणालीनुसार, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, कोअर बँकिंग सोल्यूशन, (ई-कुबेर) सिस्टिमनुसार सादर करावयाचे आहेत.



यामध्ये स्पर्धात्मक बीड्स संगणकीय प्रणालीद्वारे ई-कुबेर सिस्टिमनुसार सकाळी १०.३० ते ११.३० वाजेपर्यंत सादर करावेत. तर अस्पर्धात्मक बीडस् ई-कुबेर सिस्टिमनुसार सकाळी १०.३० ते ११.०० पर्यंत सादर करावेत. लिलावाचा निकाल भारतीय रिझर्व्ह बँकेच्या संकेतस्थळावर त्याच दिवशी प्रसिद्ध करण्यात येईल. यशस्वी झालेल्या बीडर्सकडून रकमेचे प्रदान ७ ऑगस्ट २०२४ रोजी रोखीने, बँकर्स धनादेश/प्रदान आदेश, डिमांड ड्राफ्ट किंवा त्यांच्या रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, मुंबई येथील खात्यात देय असलेले धनादेश बँकेची कामकाजाची वेळ संपण्यापूर्वी अधिदानाने प्रदान करण्यात येतील.

कर्जरोख्याचा कालावधी १० वर्षांचा असून, रोख्यांचा कालावधी ७ ऑगस्ट २०२४ पासून सुरू होईल, तर कर्जरोख्याची परतफेड दिनांक ७ ऑगस्ट २०३४ रोजी पूर्ण किमतीने केली जाईल. व्याजाचा दर लिलावात विक्री केलेल्या रोख्यांवरील दरसाल दर शेकडा कूपन दरा एवढा असेल. व्याजाचे प्रदान प्रतिवर्षी फेब्रुवारी ७ आणि ऑगस्ट ७ रोजी सहामाही पद्धतीने करण्यात येईल.

शासकीय रोख्यांमधील बँकांची गुंतवणूक ही बँकिंग विनियम अधिनियम १९४९ खालील कलम २४ अंतर्गत सांविधिक रोकड सुलभता गुणोत्तर (ङ्ख्ठ) या प्रयोजनार्थ पात्र समजण्यात येईल. हे कर्जरोखे पुन: विक्री-खरेदीसाठी अनुज्ञेय असतील, अशी माहिती वित्त विभागाने दिली आहे.

# शाब्बास स्वप्नील तुझ्या कांस्य पदकामुळे महाराष्ट्राच्या चेहऱ्यावर पसरले हास्य - मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

मुंबई, : - शाब्बास स्वप्नील तुझ्या कांस्य पदकामुळे महाराष्ट्राच्या चेहऱ्यावर हास्य पसरले आहे. तुझी कामगिरी महाराष्ट्रासाठी अभिमानास्पद आहे. तू आमचा अभिमान आहेस, अशा शब्दांत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नेमबाज स्वप्नील कुसाळेचे अभिनंदन केले. तसेच या कामगिरीसाठी स्वप्नीलला एक कोटी रुपयांचे पारितोषिक दिले जाईल, असे जाहीर केले. मुख्यमंत्री श्री. शिंदे आणि महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशनचे अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पॅरीसमध्ये असलेल्या ऑलिंपिकवीर स्वप्नीलशी तसेच त्याच्या प्रशिक्षक दिपाली देशपांडे, विश्र्वजीत शिंदे यांच्याशी दूरदृश्य प्रणालीद्वारे संपर्क साधला. मुख्यंमत्री श्री. शिंदे म्हणाले, स्वप्नीलचे रौप्य पदक अवघ्या ०.१ गुणांनी हुकले आहे. तरीही त्याने कांस्य पदक पटकावल्याने महाराष्ट्राच्या चेहऱ्यावर हास्य फुलले आहे. महाराष्ट्राला वैयक्तिक कामगिरीसाठी ७२ वर्षांनी पदक मिळाले आहे. या कामगिरीसाठी स्वप्नीलला एक कोटी रुपयांचे पारितोषिक दिले जाईल. त्याचा आणि त्याचे प्रशिक्षक, आई-वडील यांचा यथोचित सत्कारही केला जाईल. याशिवाय स्वप्नीलला नेमबाजीतील पुढील तयारीसाठी आवश्यक, त्या सर्व सोयी-सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील. स्वप्नीलने आपल्या कामगिरीने इतिहास रचला आहे. या यशासाठी कुसाळे कुटुंबियांसह, त्याला मार्गदर्शन करणारे, प्रशिक्षक आदींची मेहनत महत्वाची ठरली आहे.

# अण्णाभाऊ व टिळकांचे कार्य प्रेरणादायी

लातूर, - लोकशाहीर, साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे



व लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचे कार्य प्रेरणादायी असून प्रत्येकांनी त्यांच्या कार्याचा अंगिकार करावा, असे आवाहन येथील राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलाचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे यांनी केले.

येथील राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलातील राजमाता जिजामाता विद्यालय, तुळजाभवानी विद्यालय, राजमाता जिजामाता बी. एड. कॉलेज व संगमेश्वर विद्यालयात गुरुवारी अण्णाभाऊ साठे यांची जयंती व लोकमान्य टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित अभिवादनप्रसंगी प्राचार्य केंद्रे बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेच्या अध्यक्षा के. ए. जायेभाये होत्या. प्रारंभी अण्णाभाऊ व टिळक यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी प्राचार्य केंद्रे यांनी या महापुरुषांच्या कार्याची महती सांगत संकुलातील उपक्रमांची माहिती दिली. यावेळी प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, उपप्राचार्या कविता केंद्रे, मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, समन्वयक अश्विनी केंद्रे व वैशाली केंद्रे, संस्थेच्या सदस्य स्वाती घुले, राजेंद्र जायेभाये, प्राचार्य जी. आर. मुंडे, राजीव मुंढे, पर्यवेक्षिका सुनीता जवळे, शिवकांत वाडीकर, परमेश्वर गित्ते, विष्णू कराड यांच्यासह संकुलातील शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रास्ताविक राजीव मुंढे यांनी तर सूत्रसंचालन पर्यवेक्षिका सुनीता जवळे यांनी केले. आभार ए. बी. मुंडे यांनी मानले.

## दयानंद विज्ञानमध्ये लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांची जयंती उत्साहात साजरी

लातूर : येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयात दि.०१



ऑगस्ट २०२४ रोजी साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.यावेळी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.सिद्धेश्र्वर बेल्लाळे यांनी साहित्य प्रतिभेचा महामेरू,साहित्यरत्न, जननायक,लोकप्रबोधनकार,

लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले आणि सर्वांना जयंतीच्याही शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी कार्यालयीन अधीक्षक नवनाथ भालेराव,संगणकशास्त्र विभाग प्रमुख डॉ.रोहिणी शिंदे,पीआरओ प्रा.बळवंत सूर्यवंशी,महेंद्र कोराळे,डॉ.संगीता जाजू,किशोर जाधव,सुदाम सातपुते,सुजित अपसिंगेकर,दिलीप राठोड,श्रावण माळी,राहुल बनभेरू,बाबासाहेब बचाटे,पुजा सूर्यवंशी,अमोल क्षिरसागर,सुदर्शन काळे यांच्यासह इतर प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.

## राजधानीत लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांना जयंतीदिनी अभिवादन

नवी दिल्ली,: साहित्यरत्न, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे



यांच्या १०४ व्या जयंतीदिनी महाराष्ट्र सदन आणि महाराष्ट्र परिचय केंद्रात अभिवादन करण्यात आले.

कॉपर्निकस मार्गस्थित महाराष्ट्र सदनातील सभागृहात आयोजित कार्यक्रमात केंद्रीय केंद्रीय नागरी उड्डयन व सहकारिता राज्यमंत्री, मुरलीधर मोहोळ यांनी अण्णा भाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले. यावेळी खासदार श्रीमती मेधा कुलकर्णी, धैर्यशील माने यांनीही त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. महाराष्ट्र सदनच्या अपर निवासी आयुक्त श्रीमती नीवा जैन, सहायक निवासी आयुक्त स्मिता शेलार यांच्यासह उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांनीही प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

महाराष्ट्र परिचय केंद्रात लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांना अभिवादन

महाराष्ट्र परिचय केंद्रात लोकशाहीर अण्णा भाऊ साठे जयंतीदिनी प्रभारी उपसंचालक अमरज्योत कौर अरोरा यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पअर्पण करून अभिवादन केले. यावेळी उपस्थित कर्मचाऱ्यांनीही प्रतिमेस पुष्पअर्पण करून अभिवादन केले.

## क्रीडा मंत्री संजय बनसोडे यांच्याकडून नेमबाज स्वप्नील कुसाळेचे अभिनंदन

मुंबई, :- पॅरिस येथे सुरू असलेल्या ऑलिम्पिक स्पर्धेत महाराष्ट्राच्या कोल्हापूर जिल्ह्यातील नेमबाज स्वप्नील कुसाळे यांनी अचूक वेध घेत कांस्य पदकाला गवसणी घातली आहे. त्याने ऑलिम्पिक स्पर्धेत मिळवलेल्या या उतुंग यशाबद्दल क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांनी त्याचे अभिनंदन केले आहे मंत्री श्री. बनसोडे म्हणाले की, कोल्हापूरच्या स्वप्नील कुसाळे याने पॅरिस ऑलिम्पिक २०२४ स्पर्धेत इतिहास रचला आहे. त्याने या स्पर्धेत भारताला तिसरे पदक मिळवून दिले आहे. स्वप्नीलने ऑलिम्पिकमध्ये ५० मीटर रायफल थ्री पोजीशन प्रकारात आज चमकदार कामगिरी करत कांस्यपदक मिळवलं आहे. भारतासाठी स्वप्नीलने ५० मीटर रायफल थ्री पोजिशन प्रकारात पदक जिंकणारा एकमेव खेळाडू हा बहुमान मिळवला आहे. राज्य शासनाने स्वप्नीलसह ऑलिम्पिक स्पर्धेसाठी राज्यातील सर्व खेळाडूंना सरावासाठी ५० लाख रूपये दिले होते.

हे पत्रक, मालक, संपादक, प्रकाशक रघुनाथ बनसोडे यांनी मुद्रक महेश मोतीराम राठोड यांनी मयूर ऑफसेट प्रिंटर्स, मेन रोड, मित्र नगर, लातूर, जि.लातूर - ४१३ ५१२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक लातूर प्रभात, पवन कॉलनी, कृपासदन शाळेजवळ, लातूर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - रघुनाथ वाघोजी बनसोडे, मो.८८३०२५०६४५
(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकाची जबाबदारी) RNI No.: - MAHMAR/2017/72894